पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट


अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०४ ■ शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# अजित पवार सत्तेमधून बाहेर पडणार होते ?

## शरद पवारांचा मोठा गौप्यस्फोट अन् राजकीय वर्तुळात खळबळ



प्रतिनिधी ३१ जानेवारी

**बारामती :** अजित पवार यांच्या निधानानंतर उपमुख्यमंत्री पदावर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार विराजमान होणार आहेत. आज सायंकाळी मुंबईत पाच वाजता सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. त्यामुळे हालचालींना वेग आला आहे. अशातच आज सकाळी देशाचे माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत याबाबत कल्पना नसल्याचे विधान केले.

त्यानंतर त्यांनी अनेक मोठे गौप्यस्फोट केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शरद पवारांनी पहिल्यांदाच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासंदर्भात भाष्य केले आहे. 'दोन्ही राष्ट्रवादी एकत्र याव्या ही चर्चा चार महिने सुरू होती. याचं नेतृत्व अजित दादा आणि जयंत पाटील यांच्यावर होते. अपघात झाला आणि यात खंड पडला,' असा मोठा गौप्यस्फोट शरद पवारांनी केला आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्रीकरणाच्या तारीख देखील ठरली होती, असे देखील शरद पवार म्हणाले आहेत.

सध्या एक व्हिडीओ व्हायरल होत असून, या व्हिडीओत दोन्ही राष्ट्रवादीच्या नेत्यांची एकत्रीकरणासंदर्भात एक गुप्त बैठक पार पडली होती, असे सांगितले जात आहे. या बैठकीला दोन्ही बाजूंचे महत्वाचे नेते उपस्थित होते. शरद पवार आणि अजित पवार देखील होते.दुसरीकडे सुनेत्रा पवार मुंबईत दाखल झाल्यानंतर बारामती मोठ्या हालचाली होत असून, शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या महत्वाच्या नेत्यांची बैठक पार पडल्याची माहिती समजते. त्यामुळे सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर कोणत्या राजकीय घडामोडी घडणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे.

### एकत्रीकरणावर काय म्हणाले शरद पवार?

आमच्या पक्षात आणि त्यांच्या पक्षात एकत्र काम करण्याचं एकमत होतं. हा निर्णय १२ तारखेला जाहीर करायचा होता. ही तारीख अजितदादांनीच दिली होती. दोन्ही पक्षात सकारात्मक चर्चा होती पण अचानक ही घटना झाली.दोन्ही पक्ष एकत्र येण्यावरुन शरद पवारांना प्रश्न विचारताना भाजपासोबतच राहण्याचा विचार होता का अशी विचारणा करण्यात आली. त्यावर शरद पवारांनी, 'दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार होत्या. पण भाजपासोबत नाही,' असे वक्तव्य केले आहे. यानंतर आता अजित पवार हे दोन्ही राष्ट्रवादी विलीन झाल्यास सत्तेतून बाहेर पडणार होते असेच शरद पवारांनी त्यांच्या विधानातून सूचित केल्याची चर्चा रंगली आहे.

### शरद पवारांकडून अजित पवारांवर कौतुकाचे उद्गार

अजित पवार हे कर्तृत्ववान नेते होते. संघटनेत काम करताना त्यांनी नेहमीच सामान्य जनतेशी थेट संवाद साधला. लोकांचे प्रश्न समजून घेणे, त्यावर माहिती घेणे आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, हेच अजित पवारांचे वैशिष्ट्य होते. अशा शब्दांत शरद पवार यांनी अजित पवार यांच्या विषयी भावना व्यक्त केल्या. प्रत्येक व्यक्तीचे समाजासाठी काही ना काही योगदान असते. अजित अनेक वर्षे संघटनेत सक्रिय राहून लोकांच्या प्रश्नांसाठी झटत राहिले. त्यांची कामाची सुरुवात पहाटेच होत असे. कामात कधीही त्यांनी कमतरता दाखवली नाही, असे देखील शरद पवार म्हणाले.

# जयंत पाटलांचा गौप्यस्फोट!

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**मुंबई :** अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत अनेक खुलासे समोर येत आहेत. शरद पवारांनंतरजयंत पाटील यांनीही अजित पवारांसोबत झालेल्या बैठकांबाबत भाष्य केले. त्यातून अजित पवारांच्या निधनापूर्वी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचाली सुरू होत्या. त्यात पडद्यामागे बैठकाही सुरू झाल्या होत्या. सर्व काही ठरले होते. १२ फेब्रुवारीला राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची घोषणाही होणार होती असं जयंत पाटील यांनी म्हटलं. मात्र राष्ट्रवादीचं विलीनीकरण झाल्यास ते सरकारमध्ये राहणार होते का या प्रश्नावर जयंत पाटलांनी उत्तर देणे टाळले.राष्ट्रवादीच्या विलीनीकरण चर्चा सुरू होती त्यावेळी अजितदादांच्या मनात सत्तेत राहून एकत्र राहायचे होते का असा प्रश्न जयंत पाटील यांना विचारला.

# दादांची शेवटची सही सुद्धा स्मशानभूमीच्या कामासाठी

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी (दि. २८) विमान दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाले आहे. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याने देवळाली विधानसभा मतदारसंघात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार सरोज अहिरे या भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. दादांची शेवटची सही सुद्धा स्मशानभूमीच्या कामासाठी होती, असे म्हणत त्यांनी काळीज पिळवटणारी कहाणी सांगितली आहे.

आमदार सरोज अहिरे भाषणात म्हणाल्या की, दादा गेले हे मन मानायला तयार नाही. ते आवाज देतील असे वाटते. आपल्याला मुंबईत बोलावतील, असे वाटते. माझ्यासारख्या सामान्य मुलीला त्यांनी आमदार केले. माझे वडील गेले त्यावेळी मी लहान होते. बाप वारले हे कळतही नव्हते. पण आता माझा दादा गेला. माझे आयुष्य घेतले असते तरीही चालले असते. पण, माझा दादा, शेतकऱ्यांचा नेता पाहिजे होता. त्यांनी घाणेरडे राजकारण कधीही केले नाही, अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

सरोज अहिरे पुढे म्हणाल्या की, अजित दादांनी माझ्या मतदारसंघातील सय्यद पिंपरीच्या स्मशानभूमीच्या कामासाठी १ कोटी रुपये मंजूर करत त्या फाईलवर शेवटची सही केली आणि दादा गेले. हे कसे विसरु? अश्रु कसे थांबतील? पक्षाचा आदेश आला आहे, त्यामुळे मला मुंबईला जावे लागत आहे, आम्ही सर्व आमदार पवार कुटुंबाच्या पाठीमागे उभे राहू. माझा खूप मोठा आधार हरपला आहे. काम करत आलोय, काम करत राहू, ही दादांची शिकवण आहे. त्यानुसार काम करणार आहोत. दादा पुन्हा येतील, आमचे वाईट स्वप्न निघून जाईल असे

# फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पावसाची शक्यता!

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोला :** पश्चिम वऱ्हाडातील नागरिकांसाठी हवामानाबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. येत्या २ आणि ३ फेब्रुवारी रोजी पश्चिम वऱ्हाडातील काही भागांमध्ये हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान केंद्राकडून वर्तवण्यात आला आहे.

सध्या या भागात ढगाळ हवामान कायम असून सूर्यप्रकाश कमी प्रमाणात मिळत आहे. त्यामुळे किमान तापमान फारसे घसरले नसले तरी गारठा वाढल्याचा अनुभव नागरिक घेत आहेत. विशेषतः सकाळी आणि रात्रीच्या वेळेत थंडी अधिक जाणवत आहे.अकोला जिल्ह्यात नुकत्याच नोंदीनुसार किमान तापमान १५.७ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान ३१.८ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले आहे. तापमान सामान्य मर्यादेत असले तरी सतत ढगाळ वातावरणामुळे हवेत गारवा वाढला आहे. ग्रामीण भागात पहाटेच्या वेळी थंड वारे वाहत असल्याने शेतकरी, मजूर आणि लहान मुलांना थंडीचा जास्त त्रास होत आहे. अनेक ठिकाणी सकाळच्या वेळेत दव आणि गारठ्याचे प्रमाण वाढलेले दिसून येत आहे.

हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, सध्या पश्चिम विक्षोभाचा प्रभाव विदर्भातील काही भागांवर जाणवत आहे.

# विमानतळं मेट्रोने जोडणार!

**मुंबई :** मुंबईकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. राज्य सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यानच्या मेट्रो लाईन ८ ला अंतिम मंजुरी दिली आहे.

# थकीत कर वसुलीसाठी कडक पावले उचला; आयुक्तांचे सर्व विभागांना स्पष्ट निर्देश..!

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अमरावती :** महापालिकेच्या थकीत कर वसुलीसाठी अधिक प्रभावी आणि ठोस उपाययोजना राबविण्याची गरज असल्याचे मत आयुक्तांनी व्यक्त केले आहे. कर थकीत असलेल्या नागरिकांकडून वसुली वाढविण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले आहेत.

महापालिकेच्या विविध करांमध्ये मोठ्या प्रमाणात थकबाकी जमा झाली असून त्यामुळे विकासकामांवर परिणाम होत आहे. ही थकबाकी वेळेत वसूल व्हावी यासाठी नियोजनबद्ध आणि परिणामकारक कार्यपद्धती अवलंबण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या आहेत.

# सोनं १९ हजार तर चांदी ९८ हजारांनी स्वस्त !

प्रतिनिधी ३१ जानेवारी



**मुंबई :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन फेडच्या अध्यक्षपदासाठी नवीन उमेदवाराचे नामांकन केल्यामुळे जागतिक स्तरावर कडक मौद्रिक धोरणाची भीती निर्माण झाली. त्यामुळे अमेरिकी डॉलर मजबूत झाला आणि आधीच जास्त भावात असलेल्या सोनं-चांदीवर मोठा दबाव आला आणि किंमती घसरल्या. भारताच्या बाजारात सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १९ हजारांनी उतरून १,४९,०७५ रुपये तर चांदीचा भाव प्रति किलो तब्बल ९८ हजारांनी स्वस्त होऊन २,९१,९२२ रुपये झाला आहे. जागतिक सोनं बाजारात शुक्रवारपासून जोरदार नफावसुली सुरू झाली आणि त्यामुळे कालपासून सोन्या-चांदीच्या भावात ही जोरदार घसरण झाली आहे. सलग दुसऱ्या दिवशी चांदीचा भावात मोठी घसरण झाली आहे. राजधानी दिल्लीच्या सराफा बाजारात सलग २ दिवसांत चांदी ६० हजारांनी स्वस्त झाली आसून आज सकाळचा भाव प्रति किलो ३,५०,००० रुपये आहे. राज्यातही सोनं-चांदीचे भाव घसरले आहेत. शनिवारी मुंबई, नागपूर, पुणे, छ. संभाजीनगर, कोल्हापूर आणि जळगाव या शहरांमध्ये २४ कॅरेट शुद्ध सोन्याचा भाव प्रति तोळा १,६०,५८० रुपये आहे तर दागिने बनविण्यासाठी मुख्यतः वापरण्यात येणाऱ्या २२ कॅरेट सोन्याचा भाव १,४७,२०० रुपये आहे म्हणजेच प्रति ग्रॅम १४,७२० रुपये आहे.

# 'सीटीईटी'साठी इलेक्शन ड्यूटी होणार रद्द!

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**सोलापूर :** केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) ७ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी तरुण-तरुणींसह शिक्षकांनी देखील अर्ज केले आहेत. या परीक्षेसाठी अर्ज केलेल्या शिक्षकांना इलेक्शन ड्युटीतून सवलत दिली जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील परीक्षेला बसलेल्या शिक्षकांची तालुकानिहाय माहिती मागविली आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने गुरुवारी (ता. २९) वेळापत्रकात बदल केला आणि मतदानाची तारीख ५ ऐवजी ७ फेब्रुवारी केली. त्यामुळे इलेक्शन ड्युटी आलेल्या शिक्षकांची पंचाईत झाली होती.

सर्वोच्च न्यायालयाच्या

# शरद पवारांना अंधारात ठेवून उपमुख्यमंत्रीपदाच्या हालचाली!

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**बारामती :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आता राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. परवा अजित पवारांवर अंत्यसंस्कार केले गेले. त्यानंतर आता बारामती आणि मुंबई यांच्यातील अंतर कमी झालं असून अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहे. मात्र, दुसरीकडं दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याची चिन्हं धुसर होऊ लागली आहेत. बारामतीत काल रात्री मोठ्या हालचाली पहायला मिळाल्या. त्यानंतर आता राजकारणातील चित्र स्पष्ट होऊ लागलं आहे.

दोन्ही राष्ट्रवादीच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत चर्चा करण्यासाठी शरद पवार यांच्या बारामती येथील निवासस्थानी शुक्रवारी रात्री उशिरा पवार कुटुंबाची एकत्रित बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी शरद पवारच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्रीपदावर नाव फिक्स होईल, अशी शक्यता होती. मात्र, अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार, पुत्र पार्थ पवार आणि जय पवार हे मुंबईला रवाना झाले. तिघंही शरद पवारांसोबतच्या बैठकीला हजर राहिले नाहीत.

बुधवारी विमान अपघातात अजित पवार यांचे निधन होण्यापूर्वी अजित पवार यांनी विलीनीकरणाची इच्छा व्यक्त केली होती. अजित पवार यांनी वारंवार जाहीर भाषणातून तसे संकेत देखील दिले होते. याबाबत पवार कुटुंबीय एकत्र चर्चा करणार होते. मात्र, पवार कुटुंबीयांची एकत्रित बैठक झाली नाही. सूत्रांनी सांगितलं की, राज्य मंत्रिमंडळातील उपमुख्यमंत्रीपद स्वीकारताना शरद पवार किंवा त्यांच्यापैकी कोणाशीही सल्लामसलत न केल्याबद्दल कुटुंबातील सदस्य सुनेत्रा पवार यांच्यावर नाराज आहेत. दरम्यान, शरद पवार यांनी यावेळी मोठं वक्तव्य केलं. दोन राष्ट्रवादी एकत्र व्हाव्यात ही दादांची इच्छा होती. त्यांची ही इच्छा पूर्ण व्हावी अशी आमची इच्छा आहे, असं म्हणत शरद पवार यांनी पहिल्यांदाच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनिकरणावर वक्तव्य केलं आहे.

### सुनेत्रा पवार यांचा आज शपथविधी!

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदी विराजमान होणार आहेत. आज संध्याकाळी ५ वाजता सुनेत्रा पवारांचा शपथविधी होणार आहे. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री असतील. सदर शपथविधीपूर्वी दुपारी २ वाजता विधानभवनात राष्ट्रवादीच्या विधिमंडळ पक्षाची बैठक होणार आहे. या बैठकीत सुनेत्रा पवारांची विधीमंडळ गटनेतेपदी निवड केली जाईल. या बैठकीबाबत सुनील तटकरे यांनी विधिमंडळात पक्षाचं अधिकृत पत्रही दिलं आहे. दरम्यान आजच्या शपथविधीसाठी सुनेत्रा पवार बारामतीहून मुंबईत दाखल झाल्या आहेत. दरम्यान, उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी घेतल्यानंतर सुनेत्रा पवार यांना राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागेल. यामुळे रिक्त होणाऱ्या जागी पार्थ पवार यांची वर्णी लागण्याची शक्यता आहे.

### राष्ट्रवादी पक्षाच्या निर्णयांना आमचा पाठिंबा- देवेंद्र फडणवीस

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबतचा कोणताही निर्णय हा राष्ट्रवादी पक्षच घेईल. राष्ट्रवादी पक्षाच्या त्या निर्णयांना आमचा पाठिंबा असेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी माझ्यासोबत दोनवेळा चर्चा केली आहे. पण कोणत्याही मुद्यावरचा अंतिम निर्णय हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घेईल, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली.

### आमची कोणतीही चर्चा नाही - शरद पवार

सुनेत्रा पवारांनी केवळ प्रतिभा पवारांना फोनवरून शपथ घेण्यासाठी मुंबईला जात असल्याच सांगितल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर आज शरद पवार यांनी आज पत्रकार परिषदेत धक्कादायक खुलासा केला. सुनेत्रा पवारांसोबत आमची कोणतीही चर्चा नाही , शपथविधी आहे हे आम्हाला माहितच नाही पटेल तटकरे त्यांच्या पक्षाचे नेते त्यांच्या पक्षानं काय करावं हा त्यांचा अधिकार असल्याचं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

# भारतात आज एकवटणार 22 मुस्लीम देश! मुस्लीम देशांच्या बैठकीचे यजमानपद भारताकडे

वृत्तसंस्था ३१ जानेवारी

**नवी दिल्ली :** जगभरातल्या इस्लामिक देशांचे नेते भारताची राजधानी दिल्लीमध्ये जमणार आहेत. शनिवारी, ३१ जानेवारीला हे नेते एकत्र येतील. या बैठकीची अध्यक्षता भारत आणि यूएई करणार आहे. भारत आणि अरब देशांमधील सहकार्याची वीण अधिक घट्ट करणं, भागीदारीला नवीन दिशा देणं, हा या बैठकीमागचा उद्देश आहे. या बैठकीत २२ अरब देशांचे परराष्ट्र मंत्री सहभागी होणार आहेत. दिल्लीत भारत मंडपम येथे ही परिषद होणार आहे. भारत या




परिषदेच यजमानपद भूषवत आहे.

परराष्ट्र मंत्रालयाकडून या बद्दल माहिती देण्यात आलीय. अरब लीगमधील सर्व सदस्य देशांचे परराष्ट्र मंत्री आणि अरब लीगचे महासचिव या बैठकीत सहभागी होतील. या बैठकीआधी आज भारत मंडपममध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. अशी बैठक जवळपास १० वर्षानंतर होत आहे. याआधी २०१६ साली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ही बैठक बहरीन येथे होती. भारत स्वत: अरब देशांची संघटना लीग ऑफ अरब स्टेट्सचा पर्यवेक्षक आहे. या संघटनेत एकूण २२ सदस्य देश आहेत. लीग ऑफ अरब स्टेट्सची स्थापना २२ मार्च १९४५ रोजी काहिरा येथे झाली. या संघटनेत सुरुवातीला इजिप्त, इराक, जॉर्डन, लेबनान, सौदी अरेबि आणि सीरिया हे देश होते. त्यावेळी या लीगची सुरुवात सात सदस्यांनी झालेली. सध्या अरब लीगमध्ये जगातील २२ देश आहेत. यात उत्तर आफ्रिका आणि मध्य पूर्वेतील सुद्धा देश आहेत. सीरियाचा पुन्हा समावेश करण्यात आला आहे. या लीगमध्ये आर्मेनिया, ब्राझील, चाड, इरिट्रिया, ग्रीस, भारत आणि वेनेजुएला असे ऑब्जर्वर देश सुद्धा आहेत. या बैठकीत दोन्ही बाजूने व्यापार, ऊर्जा, शिक्षण, तंत्रज्ञान, मीडिया आणि सांस्कृतिक सहकार्य आणखी मजबूत करण्यावर चर्चा करतील. भारत या परिषदेच यजमानपद भूषवून अरब देशांसोबतचे संबंध अजून बळकट करायचे आहेत.

### ९० लाखांपेक्षा अधिक भारतीय अरब देशात करतात काम

भारत आणि अरब देशांमध्ये जुने संबंध आहेत. व्यापार, ऊर्जा, शिक्षा, संस्कृती आणि कूटनीति सारख्या क्षेत्रात मजबूत सहकार्य आहे. भारत आणि अरब देशांमध्ये व्यापार २४० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. भारत आपल्या गरजेचं तेलं, गॅस आणि एलपीजी अरब देशांकडूनच विकत घेतो. ९० लाखापेक्षा जास्त भारतीय अरब देशांमध्ये काम करतात.

# पहिल्यांदाच होणार रविवारी अर्थसंकल्प सादर!

वृत्तसंस्था ३१ जानेवारी

**नवी दिल्ली :** २०२६ या वर्षातील आर्थिक इव्हेंट म्हणजेच केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ चे २९ जानेवारी रोजी संसदेच्या पटलावर आर्थिक सर्वेक्षण सादर झाले. १ फेब्रुवार रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण या देशाचा लेखाजोखा सादर करतील. हे बजेट अनेक अर्थांनी ऐतिहासिक ठरणार आहे. हा मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा अर्थसंकल्प तर निर्मला सीतारमण यांच्या नावावर सलग नववे अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रमही असणार आहे.

१ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. त्यांचं भाषण सकाळी ११ वाजता सुरू होईल. हे बजेट येत्या आर्थिक वर्षात सरकारच्या आर्थिक धोरणांची दिशा ठरवेल. साधारणत: दरवर्षी अर्थसंकल्प सादर करण्यासाठी आठवड्यातील एक कामकाजाचा दिवस निवडला जातो, परंतु भारताच्या इतिहासात प्रथमच, यंदाचं बजेट हे रविवारी ( १फेब्रुवारी) सादर केलं जाईल. अर्थमंत्री सकाळी ११ वाजता संसदेत आपले भाषण सुरू करतील. २०१७ पूर्वी, फेब्रुवारीच्या शेवटच्या दिवशी अर्थसंकल्प सादर केला जात असे, परंतु माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांनी ही परंपरा बदलून बजेट सादर करण्याचा दिवस १ फेब्रुवारी रोजी केला. या अर्थसंकल्पाकडून देशभरातील विविध क्षेत्रांना, सेक्टर्सना मोठ्या अपेक्षा आहेत. त्यामुळे सर्वांचे लक्ष अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणाकडे लागले आहे.

## अर्थसंकल्पाकडून सर्वसामान्यांना अनेक अपेक्षा!

### अर्थसंकल्प अधिवेशन दोन टप्प्यात

अर्थसंकल्पीय अधिवेशनाची सुरुवात २८ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने झाली. हे अधिवेशन दोन टप्प्यात होणार असून, पहिला टप्पा २८ जानेवारी रोजी सुरू झाला आणि १३ फेब्रुवारी रोजी संपेल. तर अधिवेशनाचा दुसरा टप्पा ९ मार्च रोजी सुरू होईल आणि २ एप्रिल रोजी संपेल. विविध संसदीय समित्यांना अर्थसंकल्पीय घोषणा आणि मंत्रालयांच्या मागण्यांवर तपशीलवार चर्चा करण्यासाठी दरम्यान एक मोठा ब्रेक आवश्यक आहे.

CMYK CMYK

# सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


## तिघांकडून धारधार शस्त्र जप्त

**खामगाव :** शहर व परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने गस्त वाढविली आहे. दरम्यान, गुरुवारी गस्तीवर असताना पोलिसांनी कोलोरी शिवारात तिघां कडून धारधार शस्त्रे जप्त केली.

खामगाव-अकोला रोडवरील एका धाब्या जवळ संशयास्पद हालचाली आढळून आल्याने पोलिसांनी बाळापूर येथील तिन्ही संशयितांची झडती घेतली. यावेळी त्यांच्याकडून एक चाकू, एक सुरा तसेच अन्य धारधार शस्त्र जप्त करण्यात आले. यावेळी मोहम्मद उबेद मोहम्मद मतीन, मोहम्मद सुफियान फैज मोहम्मद व आणखी एका संशयितास अटक करण्यात आली. संशयितांकडे शस्त्रे बाळगण्याबाबत कोणतीही कायदेशीर परवानगी नसल्याचे तपासात निष्पन्न झाले. शहरात चोरी, दरोडे व इतर गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याने पोलिस सतर्क असून, संशयितांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे, असे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी पोलिस कर्मचारी बाळकृष्ण फुंडकर यांच्या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास खामगाव ग्रामीण पोलिस करीत आहेत.

# अवतार मेहेर बाबांचा ५७ वा अमर तिथी महोत्सव

### ◆ लाखो बाबा प्रेमी अहिल्यानगर जिल्ह्यातील मेहेराबाद येथे दाखल

प्रतिनिधी ३१जानेवारी



**अहिल्यानगर :** अवतार मेहेर बाबा यांच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील मेहेराबाद येथे अवतार मेहेर बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी देश-विदेशातून लाखो बाबा प्रेमी मेहराबाद येथे दाखल झाले.

आज दुपारी ठीक दुपारी बारा वाजता च्या ठोक्याला १५ मिनिटं मौन ठेऊन मेहेर बाबांचे स्मरण करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा यंदा ५७ वी मेहेरबाबांची अमर तिथी महोत्सव मेहराबाद येथे संपन्न झाला. ३० आणि ३१ जानेवारी रोजी मेहराबाद येथील बाबांच्या समाधी स्थळावर देश-विदेशातून आलेल्या बाबा प्रेमींनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून बाबा प्रेमींना मंत्रमुग्ध केले.

३१ जानेवारी रोजी साडेअकरा वाजता मेहेरबाबांच्या जीवनावर मनोगत व्यक्त करण्यात आले. त्यानंतर मेहेर धून बाबा प्रेमींनी उत्साहात म्हटली. त्यानंतर दुपारी बाराच्या ठोक्याला पंधरा मिनिट बाबा प्रेमींनी मौन ठेवले होते. त्यानंतर आरती करण्यात आली. यावेळी समाधी स्थळाचे लाखो भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेतले. दिवसभर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी अमरावती,नागपूर अकोला व विदर्भातील सर्वच जिल्ह्यातून ३० जानेवारी रोजी बाबा प्रेमी मेहराबाद येथे दर्शनासाठी दाखल झाले होते.

# दृष्टीहिनांच्या विदर्भस्तरीय क्रिकेट स्पर्धेत अमरावती अंध विद्यालयाचा दमदार विजय

प्रतिनिधी ३१जानेवारी

### ♦ चिखलदरा संघावर १९ धावांनी मात

**अमरावती :** स्व. आबासाहेब देवस्थळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित दृष्टीहिनांच्या विदर्भस्तरीय क्रिकेट स्पर्धेत अमरावती अंध विद्यालयाच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत निवासी चिखलदरा संघावर १९ धावांनी महत्त्वपूर्ण विजय मिळवला. या सामन्यात अमरावती संघाने सर्वांगीण कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघावर वर्चस्व राखले.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच अमरावती अंध विद्यालयाच्या खेळाडूंनी संयमी आणि आत्मविश्वासपूर्ण खेळ केला. फलंदाजी करताना संघाने धावफलक हलता ठेवत समाधानकारक धावसंख्या उभारली. प्रत्येक फलंदाजाने आपली जबाबदारी ओळखून खेळ करत संघाच्या



धावसंख्येत मोलाची भर घातली.

लक्ष्याचा पाठलाग करताना निवासी चिखलदरा संघाने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. काही फलंदाजांनी चांगली झुंज दिली, मात्र अमरावती संघाच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत चिखलदरा संघाला लक्ष्य गाठू दिले नाही. ठरावीक अंतराने घेतलेल्या विकेट्समुळे चिखलदरा संघावर दबाव वाढत गेला.

अखेर निर्धारित षटकांत चिखलदरा संघाला अपेक्षित धावसंख्या गाठता न आल्याने अमरावती अंध विद्यालयाचा संघ १९ धावांनी विजयी ठरला. या विजयामुळे स्पर्धेत अमरावती संघाचे मनोबल उंचावले असून पुढील सामन्यांसाठी संघ अधिक आत्मविश्वासाने मैदानात उतरणार आहे.

दृष्टीहिन खेळाडूंच्या क्रीडा कौशल्याला व्यासपीठ मिळावे आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही विदर्भस्तरीय क्रिकेट स्पर्धा प्रेक्षकांचेही लक्ष वेधून घेत आहे. अमरावती अंध विद्यालयाच्या या विजयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात आदरांजली



**अमरावती :** राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आदरांजली वाहिली. तसेच, याप्रसंगी हुतात्मा दिनानिमित्त देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांना दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, प्रसेनजित चव्हाण, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, जिल्हा खनीकर्म अधिकारी प्रणिता चापले, अधिक्षक निलेश खटके यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी यांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी आदरांजली वाहिली.

# पारधी, फासे पारधी समाजाने योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अमरावती :** धारणी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातर्फे सन २०२५-२६ या वर्षासाठी 'पारधी पॅकेज' अंतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जमातीच्या फक्त पारधी आणि फासे पारधी समाजातील पात्र लाभार्थ्यांनी २० फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. पारधी समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी पाच मुख्य योजनांसाठी अर्थसहाय्य दिले जाणार आहे. यात लाभार्थ्यांना शेळ्यांचा गट घेण्यासाठी अर्थसहाय्य. स्वयंरोजगारासाठी ऑटो रिक्षा खरेदीकरिता मदत, संगणक व झेरॉक्स मशीन खरेदी करून तांत्रिक व्यवसाय सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य, पारधी समाजातील बचतगटांसाठी ट्रॅक्टर खरेदीची सुविधा, गरजू लाभार्थ्यांना व्यवसायासाठी ई-खटला खरेदीसाठी मदत देण्यात येणार आहे.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्ती योजना परीक्षेची अंतिम उत्तरसूची जाहिर

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदमार्फत २८ डिसेंबर, २०२५ रोजी इयत्ता आठवीसाठी घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) परीक्षेची अंतिम उत्तरसूची परिषदेच्या https://www.mscepune.in/ व https://2026.mscenmms.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. अशी माहिती आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे दिली आहे.

या परीक्षेच्या (सॅट व मॅट) विषयाच्या पेपरच्या प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नाबाबत किंवा पर्यायी उत्तराबाबत त्रुटी आक्षेपबाबतचे ऑनलाईन निवेदन दि. १६ जानेवारी २०२६ अखेरपर्यंत पाठविण्याबाबत प्रसिध्दी निवेदनाद्वारे कळविण्यात आले होते. त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त झालेल्या ऑनलाईन निवेदनांवर विषयतज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन अंतिम उत्तरसूची प्रसिध्द करण्यात आली आहे. या अंतिम उत्तरसूचीबाबत कोणतेही निवेदन/आक्षेप स्विकारले जाणार नाहीत, तसेच सदर परीक्षेसाठी गुणपडताळणी केली जाणार नाही, याची मुख्याध्यापकांनी, पालकांनी व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. या अंतिम उत्तरसूचीनुसार राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षा (एनएमएमएस) निकाल यथावकाश. परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, असेही परिषदेव्दारे कळविण्यात आले आहे.

# बौद्ध समाजातील संस्थांना पायाभूत सुविधांसाठी १० लाखांपर्यंत अनुदान

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अमरावती :** राज्यातील धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असलेल्या आणि ज्या संस्थांमध्ये ५१ टक्केपेक्षा जास्त बौद्ध समाजातील विश्वस्त किंवा सदस्य आहेत, अशा संस्थांसाठी राज्य शासनाकडून मदत दिली जाणार आहे. बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना पायाभूत सोयीसुविधांसाठी १० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे.

या योजनेंतर्गत पात्र संस्थांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागवले आहेत. इच्छुक संस्थांनी प्रस्ताव २० फेब्रुवारीपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावे लागणार आहे. यासाठी संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत असणे आणि नोंदणी प्रमाणपत्राची सत्यप्रत असणे आवश्यक आहे. संस्थेच्या विश्वस्त किंवा सदस्यांमध्ये बौद्ध समाजाचे प्रमाण ५१ टक्केपेक्षा जास्त असावे. या योजनेचा लाभ एका संस्थेला पाच वेळाच घेता येणार आहे. या योजनेंतर्गत प्रामुख्याने स्वतःची इमारत असल्यास इमारतीचे किरकोळ नूतनीकरण व डागडुजी, शुद्ध पेयजल व्यवस्था, प्रसाधनगृह आणि स्वच्छतागृह उभारणी, ग्रंथालय, अभ्यासिका, संगणक कक्ष किंवा रिसर्च सेंटर अद्ययावत करणे, विपश्यना केंद्र किंवा प्रशिक्षण केंद्राचे नूतनीकरण, फर्निचर, जनरेटर, इन्व्हर्टर, सोलर सुविधा आणि सुरक्षा कॅमेरे बसवणे, कार्यशाळा किंवा सभागृहाचे बांधकाम व सुशोभीकरण या सुविधांसाठी निधी दिला जाणार आहे.

### अमरावतीत राष्ट्रीय क्रीडा इतिहास : अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धेचे भव्य आयोजन

# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीने उचलला महाआयोजनाचा शिवधनुष्य

प्रतिनिधी ३१जानेवारी

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धा (पुरुष व महिला) २०२५–२६ चे आयोजन करण्यात आले असून, ही स्पर्धा अमरावती विद्यापीठ व अमरावती शहरासाठी ऐतिहासिक आणि मैलाचा दगड ठरणारी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा ठरणार आहे. ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा दिनांक १ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथे नियोजित दिमाखदार सोहळ्याने सुरु होणार आहे.




या भव्य स्पर्धेमध्ये देशभरातील विद्यापीठांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला असून, पुरुष गटातून १०७ तर महिला गटातून ९८ देशभरातील नामांकित विद्यापीठांचे संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यापीठांचा सहभाग असलेली सॉफ्टबॉल स्पर्धा अमरावतीत प्रथमच आयोजित होत आहे, हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य आहे. पुरुष तसेच महिला गटाची अजिंक्यपद स्पर्धा एकाच यजमान पदाखाली होत असल्यामुळे ३.५ हजाराहून खेळाडूंचे अमरावती शहरात आगमन होणार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील विद्यापीठीय स्पर्धांमध्ये विजेतेपद प्राप्त करून या राष्ट्रीय स्पर्धेत संघ सहभागी होत आहे.

या निमित्ताने नामवंत खेळाडू विद्यापीठ चमूचे मार्गदर्शक, सामन्यांचे पंच आणि इतर भूमिकांमध्ये या स्पर्धेच्या निमित्ताने अमरावती शहरात प्रथमतःच येत असल्यामुळे सॉफ्टबॉल या खेळामध्ये आपल्या उज्ज्वल कारकीर्द घडविण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या युवा खेळाडूंना हि सुवर्णसंधी प्राप्त झाली आहे.

**ग्रँड ओपनिंग सेरेमनी व चॅम्पियनशिप बॅटन प्रोसेशन**

या राष्ट्रीय स्पर्धेची सुरुवात भव्य, उत्सवी आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध मानल्या जाणाऱ्या ग्रँड ओपनिंग सेरेमनी व चॅम्पियनशिप बॅटन प्रोसेशनच्या माध्यमातून होणार आहे. दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता देशभरातील सर्व चॅम्पियन संघ श्री. शिवाजी कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, डॉ. पंजाबराव देशमुख चौक, पंचवटी, अमरावती येथे एकत्रित येतील. त्यानंतर या ठिकाणाहून चॅम्पियनशिप बॅटन प्रोसेशन प्रारंभ होऊन स्वतंत्र भारताचे पहिले कृषिमंत्री, संविधान सभेचे महत्वपूर्ण घटक म्हणून संविधान निर्मितीत महत्वपूर्ण योगदान देणारे कृषिरत्न शिक्षणमहर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या स्मृतीस्थळावर अभिवादन करून चॅम्पियनशिप बॅटन प्रोसेशन श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित भव्य उद्घाटन सोहळ्याच्या ठिकाणी पोहोचणार आहे. सर्व संघ आपल्या अधिकृत गणवेशात आणि विद्यापीठ ध्वजासह या समारंभात सहभागी होणार असून, हा कार्यक्रम राष्ट्रीय एकात्मता, क्रीडासंस्कृती आणि युवाऊर्जेचे प्रतीक ठरणार आहे. या वैशिष्ट्यपूर्ण चॅम्पियनशिप बॅटन सेरेमनीमध्ये बॅटन मिरविण्यासाठी प्रत्येक राज्यातून एका कर्णधाराची निवड लॉटद्वारे करण्यात येणार आहे. निवडलेले कर्णधार बॅटन हातात घेऊन पुढे देत राष्ट्रीय क्रीडाऐक्याचे प्रतीकात्मक दर्शन घडवतील. ही मिरवणूक बॅटन लाइटिंग सेरेमनीने क्रीडांगणावर संपन्न होणार आहे.

या राष्ट्रीय स्पर्धेतील पुरुष गटाच्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ सॉफ्टबॉल अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन दिनांक १ फेब्रुवारी २०२६ सायंकाळी ४.०० वाजता श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या सुसज्ज क्रीडांगणावर आयोजित करण्यात आले

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# श्री संत गजानन महाराज प्रकट दिन उत्सवानिमित्त शंकर नगरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ३१जानेवारी

**खामगांव:** श्री संत गजानन महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, खामगांव यांच्या वतीने शंकर नगर (यशोधरा नगर), खामगांव येथील श्री संत गजानन महाराज मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री संत गजानन महाराजांचा प्रकट दिन उत्सव भक्तिभावाने साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने मंदिर प्रांगणात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. उत्सवाची सुरुवात रविवार दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी कलश पूजन व वीणा प्रारंभाने होणार असून त्याच दिवशीपासून श्री संत तुकाराम महाराज चरित्र कथा रविवार दि. ०१ फेब्रुवारी ते शुक्रवार दि. ०६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दररोज दुपारी १२ ते ४ या वेळेत आयोजित करण्यात आली आहे. गुरुवार दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत भजनाचा कार्यक्रम होणार असून दुर्गा सप्तपदी महिला मंडळ, यशोधरा नगर तसेच महालक्ष्मी भजन मंडळ, गजानन कॉलनी हे भजन सादर करणार आहेत. निर्माणाधीन मंदिरातील माँ दुर्गामातेच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व पूर्णाहुती शुक्रवार दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. शनिवार दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता काल्याचे कीर्तन ह.भ.प. महादेव महाराज, पोरज यांच्या वाणीतून होणार असून त्याच दिवशी दुपारी १२ ते ४ या वेळेत भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सव काळात दररोज सायंकाळी ८ वाजता कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून रविवार दिनांक ०१ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. भारतीताई गजानन धोटे (पारखेड), सोमवार दिनांक ०२ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. पवन महाराज चहाटे (अंजनगांव सुर्जी), मंगळवार दिनांक ०३ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. पंढरी महाराज डिघोळे (जवळा बु.), बुधवार दिनांक ०४ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. ज्योतीताई रमेश काळे (शिंगाळे), खामगांव, गुरुवार दिनांक ०५ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. कैलास महाराज मोरखडे (अटाळी) तसेच शुक्रवार दिनांक ०६ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. नाना महाराज पजई (खामगांव) हे कीर्तनकार आपले कीर्तन सादर करणार आहेत. या कीर्तन कार्यक्रमांना आचार्य ह.भ.प. महादेव महाराज (घोरज) यांचे मार्गदर्शन लाभणार असून गायनाचार्य म्हणून ह.भ.प. श्रीराम महाराज अंजनसांडे व ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वरखेडे तसेच मृदंगाचार्य म्हणून ह.भ.प. सोपान महाराज अंजनसांडे सहभागी होणार आहेत.

# युग धर्म पब्लिक स्कूलमध्ये तीन दिवसीय स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

प्रतिनिधी ३१जानेवारी

**खामगाव :** युग धर्म पब्लिक स्कूल, खामगाव येथे तीन दिवसीय स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडले. या स्नेहसंमेलनाची सुरुवात २४ जानेवारी रोजी झाली. उद्घाटन समारंभात विद्वान मार्गदर्शक अनिल जी नावंदर, सचिव महाराष्ट्र केमीस्ट अँन्ड ड्रगीस्ट असोसिएशन, प्रकाशचंद्र केडिया संचालक शिवांगी बेकर्स खामगाव. गोपाल अग्रवाल व प्राचार्य अनिरुद्धजी अवचार सर यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. उद्घाटन शुभारंभ झाल्यानंतर (ग्रँड पेरेंट्स) आजी आजोबा पालक यांच्या मनोमिलनासाठी वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये पालकांची व आजी-आजोबांची सहभाग घेण्याचीउत्कंठा शिगेला पोहोचली होती सर्वांनी खेळांमध्ये सहभाग घेतला. त्यानंतर आनंद मेल्याचे आयोजन करण्यात आले विद्यार्थ्यांनी बनवलेले वेगवेगळे व्यंजन ची दुकाने लावून शिक्षणासोबतच त्यांना व्यवसाय कसा करावा हा त्यामागचा उद्देश आणि विशेष म्हणजे शाळेने विद्यार्थ्यांकडून कोणतेही प्रकारचे चार्जेस घेतले नाही २५ तारखेला सकाळी प्रि प्रायमरी व प्रायमरीविद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या खेळांचे आयोजन करण्यात आले होते दुपारी ४ते ९या वेळेत आयोजित आनंद मेल्यामध्ये पालकांनी व मुलांनी मन मुराद आस्वाद घेतला.सुरेख संचलन सपना रेठेकर व स्वप्ना चव्हाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन अंकिता मॅडम यांनी केले. दुपारी

४ ते रात्री ९ या वेळेत

२५ जानेवारी रोजी सकाळी नर्सरी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा मध्ये सहभागी होऊन नंबर पटकावले संध्याकाळी६ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रेक्षकांची मने जिंकली. त्यामध्ये गाणी, नृत्य, नाटिका, योगा, आजी-आजोबांसोबत नृत्य अशा विविध कला प्रकारांनी कार्यक्रम रंगला. यावेळी शिक्षणासोबत संस्कृतीची जपवणूक परिवारासोबत कशी वागणूक करावी हे शिकवल्या गेले. यावेळी अग्रवाल परिवाराचे प्रमुख बाबूलाल अग्रवाल व संपूर्ण अग्रवाल परिवार, तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचलन विद्यार्थिनी कु.यादवी जोशी व प्राचार्य अनिरुद्ध अवचार सर यांनी केले. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त अध्यक्ष गोपाल अग्रवाल, यांच्या शुभहस्ते तिरंगा फडकवून मानवंदना देण्यात आली संचालक गोविंद चुडीवाले श्री. संतोष डिडवाणीया जिल्हाध्यक्ष भाजपा व्यापारी संघ राजेश झापर्डे अध्यक्ष विश्व हिंदू परिषद, प्राचार्य अनिरुद्ध सर यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले.

# सोमवारी जिल्हा लोकशाही दिन

**अमरावती :** फेब्रुवारी महिन्याचा जिल्हा लोकशाही दिन सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे. यावेळी संबंधितांनी व्यक्तिश: उपस्थित राहावे, असे आवाहन अधीक्षक निलेश खटके यांनी केले आहे.


MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-Tender Notice

Super scribed & sealed offer in Two Bid System are invited from Reputed Firms / Contractors/Companies **for Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of Substation in Akola Circle of Akola Zone (T-11).** The e-Tender details / documents for above tender are available on website on **www.etender.mahadiscom.in** The cost of e-tender is **Rs. 1180/-** (including GST). Submit the tender duly filled in on or before **17.02.2026** up to **17.30 Hrs.** The e-Tender documents can be downloaded from aforesaid website from **31.01.2026.** If any changes in the e-tender, prospective bidders are requested to regularly check the website. Contact No. **7875763013.**

**PRO No. 20/2026**

**Superintending Engineer,**
**O&M Circle, Akola**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-Tender Notice

Super scribed tender offers are invited online from Registered Contractors / Companies for S/Dn wise e-tender **EE/AKL/U/T/T-02/NSC-Infra/2025-26** for **Empanelment of Agencies for Infrastructure development NC,DPDC & etc. scheme (Excluding Ag.) for FY 2026-27 And EE/AKL/U/T/T-03/DTC-BM/2025-26 / EE/AKL/U/T/T-04/HT-BM/2025-26/EE/AKL/U/T/T-05/LT-BM/2025-26 for Breakdown Maintenance of Distribution transformer center, HT (OH &UG) & LT (OH &UG) respectively for FY 2026-27 in Urban Division, Akola of Akola Circle.** The details of tender are available on our official website at **http://etender.mahadiscom.in/eatApp/** & can be downloaded from **Dtd.30.01.2026** onwards. Submit the tender through e-tendering process only latest by **Dtd.17.02.2026** up to **11.00 Hrs.** For further details refer our website. Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc, if any, shall be available in our website only & will not be published in the newspapers separately.

**Executive Engineer,**
**Urban Division, M.S.E.D.C.L.,Akola**

**PRO NO.-17 Date-30.01.2026**

३

सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# विदर्भ कला वैभव रंगभरण स्पर्धेत आनंदी मुरुमकार प्रथम

**अकोला :** विदर्भ कला शिक्षक संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'विदर्भ कला वैभव' रंगभरण स्पर्धेत अकोल्याच्या कु. आनंदी गणेशराव मुरुमकार हिने प्रथम क्रमांक पटकावत आपल्या कलागुणांचा ठसा उमटवला आहे. डी.ए.व्ही. कॉन्व्हेंट, अकोला येथील इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनी असलेल्या आनंदीने आपल्या रंगसंगती, कल्पक मांडणी आणि सूक्ष्म निरीक्षणामुळे परीक्षकांची विशेष दाद मिळवली. लहान वयातच तिने दाखवलेली कलात्मक जाण ही तिच्या उज्ज्वल भवितव्याची नांदी



असल्याची चर्चा उपस्थितांमध्ये रंगली आहे. या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांतून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. तीव्र स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणे ही आनंदीसाठी निश्चितच अभिमानास्पद बाब ठरली आहे.

## जीवनात भगवतीचे अधिष्ठान ठेवा-पु अंबरीश महाराज




**अकोला:** यथार्थ जीवनात सदगुरूच्या कृपेची आवश्यकता प्रत्येकाला असते. सदगुरू जवळ बसल्यावर नेहमी भागवत चर्चा केली पाहिजे. सदगुरू शिवाय सदगती मिळणे शक्य नाही. सदगुरूच्या माध्यमातूनच भगवतीचे अधिष्ठान जीवनात निर्माण होऊन शाश्वत सुख व आदीमायेची कृपा प्राप्त होऊन जीवन धन्य होत असल्याचा हितोपदेश भागवताचार्य पू अंबरीश महाराज जोशी यांनी केला.श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ, संभाजीनगर संचालित श्री जगदंब परिवार अकोलाच्या वतीने स्थानीय केशवनगर परिसरातील श्री मारुती मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या श्रीमद् देवी भागवत सप्ताहात भागवताचार्य पू अंबरीश महाराज जोशी सोनईकर यांनी देवी भागवतच्या अनुषंगाने सदगुरू चे महत्व प्रतिपादित केले. ते म्हणाले, आपण कितीही ज्ञानी असलो तरी सदगुरु शिवाय खरे ज्ञान हे प्राप्त होऊ शकत नाही.सदगुरू शिवाय मिळालेले ज्ञान हे आंधळे असते.सदगुरू हे जीवनाचा कायापालट करतात. म्हणून सदगुरूला अनन्यभावाने शरण जाऊ सकारात्मक दृष्टी आपल्या अंगी निर्माण करण्याच्या हितोपदेश त्यांनी यावेळी केला.

## दि ग्रेन मर्चंट असो. ने वाहली दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**अकोला:** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांना दी ग्रेन मर्चंट असो, आडतीया व व्यापारी वर्गाने श्रद्धांजली वाहली. कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधना बद्दल दुखवटा म्हणून व्यापारी वर्गाने आपला व्यवहार गुरुवार २९-१ २०२६ ला कडकडीत बंद ठेवून आपले दुःख व्यक्त केले.दरम्यान बाजार समितीच्या लिलाव सभागृहात श्रद्धांजली सभा घेण्यात आली.यात बाजार समितीचे संचालक राजीव शर्मा,प्रकाश लहाने, ओमप्रकाश गोयनका संदीप चौखंडे,राजेंद्र जोशी, रावसाहेब राहणे यांनी अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या विकास कार्यावर आपले विचार व्यक्त केले.यावेळी अजितदादा पवार यांच्या समवेत विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या विमानातील पायलट,सुरक्षा अधिकारी यांना ही भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. या श्रद्धांजली सभेत यावेळी अरुण केडीया,कनैय्या सराफ,संतोष लोखंडे, समवेत बाजार समितीमधील व्यापारी,अडते, कामगार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुंडा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला लागले रिक्त पदांचे ग्रहण

कुशल भगत ३१ जानेवारी

**कुटासा:** अकोट तालुक्यातील सावरा प्राथमिक आरोग्य केंद्रा मार्फत येणाऱ्या पुंडा येथील आरोग्य उपकेंद्राला रिक्त पदांचे ग्रहण लागले आहे.या उपकेंद्रात एकूण मंजूर पदे असताना गेल्या सहा महिन्या पासून फक्त एक कर्मचारी कार्यरत आहे

या उपकेंद्र अंतर्गत पुंडा, धनकवडी, करतवाडी, ढगा , सावरगाव, रोहनखेड, बांबर्डा अशी एकूण सात गावे येतात गेल्या जवळपास सहा महिन्या आधी समुदाय आरोग्य अधिकारी आणि आरोग्य सेविका यांची प्रशासकीय बदली झाली तेव्हा पासून आजतागायत सदरील पदे ही रिक्त आहेत एवढा मोठा सहा महिन्याचा कालावधी झाल्यानंतर देखील तसेच सदर बाबी संबंधित अधिकारी यांचा लक्षात असून देखील अधिकारी या कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत का ? हा प्रश्न नागरिक विचारताना दिसून येत आहे फक्त लसीकरणच्या दिवशी कर्मचारी हजर दिसतात बाकी दिवशी फक्त आरोग्य सेवक हजर असतो फक्त एक आरोग्य सेवक हा सात गावे कशी सांभाळणार नागरिकांना शासनाने वाऱ्यावर सोडले का अशा संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडुन व्यक्त केल्या जात आहेत.



आरोग्य सेवक हा रोज उपकेंद्रा वर हजर असतो पण समुदाय आरोग्य अधिकारी नसल्याने बाह्यरुग्ण तपासणी ही पूर्ण पने बंद आहे तसेच महिलांचा देखील बऱ्याच आरोग्य विषयक समस्या आहेत पण उपकेंद्रावर पूर्ण वेळ आरोग्य सेविका नसल्याने गेल्या सहा महिन्यांपासून महिलांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे.

आरोग्य समुपदेशना शिवाय इतर कोणत्याच दिवशी आरोग्य कर्मचारी गावात दिसत नाहीत त्या मुळे नागरिकाचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून याची जबाबदारी संबंधित अधिकारी स्वीकारीत का? गावात एखादी साथ लागल्यास कोण जबाबदार राहील असा प्रश्न आम्हाला पडला आहे.

**संदीप धर्माळे**
प्रभारी सरपंच, बांबर्डा

गावातील उपकेंद्रात अनेक वेळा गेलो असता आरोग्य सेवका व्यतिरिक्त एकही अधिकारी कर्मचारी उपस्थित आढळून येत नाही त्यामुळे योग्य वेळी योग्य औषधोपचार होत नसून गावात साथीची रोग पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही सदर बाबीकडे संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत

**ज्ञानेश्वर कुलट**
माजी तंटामुक्ती अध्यक्ष पुंडा

आयुष्मान आरोग्य मंदिर उपकेंद्र पुंडा येथे समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य सेविका यांची प्रशासकीय स्वरूपात बदली झाल्याने, त्या ठिकाणी अतिरिक्त प्रभार हा आयुष्मान आरोग्य मंदिर सावरा अंतर्गत कर्मचारी यांना दिला आहे. नियमित अधिकारी व कर्मचारी या साठी जिल्हा स्तरावर प्रयत्न चालू आहे.

**डॉ.प्रवीण चव्हाण**
तालुका आरोग्य अधिकारी अकोट.

# आसेगाव बाजार येथे ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोट:** संत गजानन महाराज प्रगटदिनानिमित्त ४३ वर्षापासुन संत वासुदेव महाराजांच्या प्रेरणेने आसेगाव बा. येथिल श्री हनुमान मंदीर परीसरात श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते.

सप्ताहाचे हे ४४ वे वर्ष असून सदानंद महाराज गावंडे यांच्या मार्गदर्शनात व रामदास महाराज हाके यांच्या नेतृत्त्वात १ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहात दैनंदिन काकडा आरती सकाळी ५ ते ६, ज्ञानेश्वरी पारायण सकाळी ७ ते ११, प्रवचन दुपारी ४ ते ५, हरिपाठ संध्याकाळी ६ ते ७ व हरिकिर्तन रात्री ८ ते १० संपन्न होणारं आहे.सप्ताहात रामकिशन महाराज कराळे,



पुरुषोत्तम महाराज कोळशे, दुर्गाताई मराठे, नंदकिशोर महाराज ढेंगे,रवींद्र महाराज केंद्रे,

महेश महाराज मारवाडी, नारायण महाराण पडोळे यांचे हरिकिर्तन संपन्न होणार असून ९ फेब्रुवारी रोजी सप्ताहाची समाप्ती तुकाराम महाराज सखारामपुरकर यांच्या काल्याचे किर्तनाने होणार आहे.९ मार्च रोजी आसेगाव बाजार येथे विवीध गावातील भजनी दिंड्या सहभागी होत गावात पालखी प्रदक्षिणा व मिरवणूक निघणार आहे.

सप्ताहात पुष्पाताई भगत, प्रा. दीनदयाल ठाकरे, रामदास महाराज हाके, रमेश पुंडकर, शारदाताई गावंडे,उमेश महाराज मोहोकार, संजिवनीताई वक्ते यांचे प्रवचन होणार आहे.सप्ताहात गायनाचार्य प्रवीण महाराज कुलट, मृदुंगाचार्य राम महाराज वाघ, मयुर महाराज लोड,गायनाचार्य डिगांबर बुवा भोसले, धोडुजी कराळे, हिंमतराव कराळे, बाप्पुराव राखोंडे, विश्वनाथ कराळे, बिलामराब लेकुळे, रामकिसन कराळे मुधाकर कराळे, भागवत कराळे, देवराय कराळे (डिग्रसकर), कान्होबाराव गडदे, कैलास म्हस्के, मारोती हाके, बबन म्हस्के, सांप्रदायीक भजनी मंडळ आसेगांव बाजार, पुंडा (नंदीग्राम) विणेकरी महादेवराव बोंडे, सुभाष रंदे, जनार्धनराव जोध, गजानन टोंगळे सेवा देणार आहेत.

# हिंगणा वैजनाथ येथील नवनाथ महाराजांच्या मुर्तिंची विटंबना करणाऱ्या माथेफिरूंना कठोर शिक्षा द्या

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोला:** शेगाव तालुक्यातील हिंगणा वैजनाथ गावातील सनातन हिंदू धर्मीयांचे आणि नाथपंथीयांचे आराध्यदैवत, श्रद्धास्थान नवनाथ महाराजांच्या मूर्तीची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना केली. त्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला. धार्मिक द्वेष करणाऱ्या राष्ट्रद्रोही विचारसरणीच्या व हे अविवेकी कृत्य करणाऱ्या माथेफिरूंना त्वरित शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई करून त्यांना शिक्षा करण्यात यावी. प्रशासनाने नवीन मूर्ती बसवाव्या अशी मागणी करण्यात आली.

यासंदर्भात शेगाव तहसीलदार व पोलीस स्टेशन ठाणेदार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी युवा नाथ संघटनेचे कार्याध्यक्ष नागेश

◆ युवा नाथ संघटनेची मागणी



जाधव, प्रदेश उपाध्यक्ष गजानन इंगळे, गजानन वाडेकर, प्रदेश सचिव गणेश नाथजी चिलीवंते, अकोला जिल्हा सचिव पवन तिहिले, अकोला महानगर अध्यक्ष अनिल ठाकरे, बाळापूर तालुका अध्यक्ष अंकुश जाधव, योगेश नळेकर, डॉ. रामनाथ पाटील, दत्तात्रय ठाकरे, विजय चव्हाण, राजेश कळमकार, सौ. सीमाताई वाडेकर, मयुर तिहीले, बजरंग रोडे, यश साळुंके, आदित्य पवार, निखिल भालतीलक तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

# संत तुकाराम महाराज जयंतीनिमित्त तेल्हारात भक्ती, सेवा व सामाजिक उपक्रमांचा संगम

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**तेल्हारा:** जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त तेल्हारा शहरात श्रद्धा, भक्ती आणि समाजोपयोगी उपक्रमांचा अनोखा संगम पाहायला मिळणार आहे. येथील श्री संत तुकाराम महाराज चौकात आगामी २ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमुळे तेल्हारा शहरासह तालुक्यात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांद्वारे समाजाला समतेचा, मानवतेचा व सत्याचा मार्ग दाखविला. त्यांच्या विचारांचा जागर आजच्या पिढीपर्यंत पोहोचावा, या उदात्त हेतूने यंदाच्या जयंतीनिमित्त




केवळ धार्मिकच नव्हे तर समाजहिताचे उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वच्छता अभियान राबवून स्वच्छ व सुंदर परिसराचा संदेश देण्यात येणार आहे. त्यानंतर महाआरती होऊन भक्तिमय वातावरणात संत तुकाराम महाराजांना अभिवादन करण्यात येईल.यावेळी रक्त दान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, रक्त दान जागृतीचा महत्त्वाचा संदेश देण्यात येणार आहे. सायंकाळच्या सत्रात भक्ती संध्या, कीर्तन व मान्यवरांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. विशेष आकर्षण म्हणून सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप कु. शिवलीलाताई पाटील (बार्शी, सोलापूर) यांच्या प्रभावी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून, त्यांच्या वाणीतून संत तुकाराम महाराजांचे विचार रसिक श्रोत्यांपर्यंत पोहोचणार आहेत.हा संपूर्ण कार्यक्रम कुणबी समाज संघटना व कुणबी महिला संघटना, तेल्हारा शहर व तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत तुकाराम महाराजांच्या विचारांचा जागर करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वडाळी देशमुख येथे श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाचे आयोजन

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोट:** श्री संत चतुर्भुज महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत श्री संत योगी सम्राट गजानन महाराज यांच्या प्रगट दिनानिमित्त संगीतमय भागवत कथेचे आयोजन केलेले आहे.

आरंभ १ रोजी तर सांगता दि.८ रोजी होईल. श्रीमद् भागवत कथेची वेळ सकाळी ६ ते ७ काकडा व हरिपाठ संध्याकाळी ६ ते ७ या श्रीमद् भागवत कथेचे भागवताचार्य रामकृष्ण महाराज आंबुसकर अकोला आहेत. तीर्थस्थापना गजेंद्र वावरे, विमलताई वावरे असून मुख्य यजमान अजब फुकट संगीताताई फुकट, शालिकराम लोणकर सविताताई लोणकर, देवेंद्र सुपासे सुनीताताई सुपासे, गोपाल बेलसरे भावनाताई बेलसरे, कीर्तनकार सकाळी ८:३० ते १० वा. रविवारी



हभप प्रतीक्षाताई पागृत घुसर, सोमवारी हभप मीराबाई सोनवणे दासाळा, मंगळवार दि.३ हभप केशवराज काळे भाटूबरा, बुधवार दि.४ हभप कांचताई पिंपळकार वाशिम, गुरुवार दि.५ हभप पंढरीनाथ म इंगोलेकर वाशिम, शुक्रवार दि.६ भग. हभप सौ. अरुणाताई रोडे शिंदोळा, शनिवार दि.७/२/२६ हभप सुमन ताई भानुप्रिया अकोला, भागवत सप्ताहात अन्नदानाचा वेळ १२ ते २:३०. रविवार दि.८ ला भागवताचार्य श्री ह भ प रामकृष्ण महाराज अंबुसकर यांचे काल्याचे किर्तन व नंतर महाप्रसादाला सुरुवात होईल, या मंदिराला जागा दान देणारे विजय मुरेकार, मंगेश गणगणे दानशूर यांचा मंडळाच्या वतीने विशेष सत्कार केल्या जाईल, कार्यक्रमाला मृदुंगाचार्य अजबराव अंभोरे, नंदकिशोर हाडोळे, हार्मोनियम वादक रमेश सपकाळ गायनाचार्य श्रीकृष्ण पिंपळे, प्रफुल रोंगे, पंजाब अंभोरे, पॅड वादक मंगेश अंभोरे, बॅन्जो वादक ऋषिकेश अंभोरे, विणेकरी सुधाकर देठे, चोपदार बाळूभाऊ फुलारी, मिलिंद काकड, पुजारी हरिभाऊ प्रांजळे, टाळकरी विठ्ठल भांडे, रवींद्र हाडोळे, सुदर्शन रायबोले, विनोद टोहरे, अजब फुकट, पंजाब बोरोडे, अतुल हुसे, देवेंद्र हुसे, नितीन काळे, बंडूभाऊ शेगोकार, प्रशांत काळे, प्रवीण रोही, रघुनाथ पवार, जनार्दन बोरोडे, सुशील बोरोडे, सांप्रदायिक भजनी श्री संत गजानन महिला व पुरुष भजनी मंडळ, श्री संत सावता माळी महिला व पुरुष भजनी मंडळ, श्री चतुर्भुज महाराज महिला व पुरुष भजनी मंडळ, श्री बूद्धेश्वर महाराज भजनी मंडळ, यांचा सहभाग गाव प्रदक्षिणा मिरवणुकीमध्ये राहणार आहे तरी या श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाचे व महाप्रसादाचे अवश्य लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन आयोजक श्री संत गजानन महाराज मंदिर विश्वस्त मंडळ व समस्त गावकरी यांनी केले आहे.

# संताजी धनाजी सारखे विरोधकांना भाजप नेते दिसतात - जयंत मसने

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोला:** संताजी धनाजी सारखे भाजपाचे नेते काँग्रेस आणि उबाठा सेना नेत्यांना सातत्याने दिसतात. त्यामुळे बेछूट आरोप करून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचा अपमान करत आहेत. हा अपमान जनता सहन करणार नाही.

लोकशाहीमध्ये संविधानाला मानणाऱ्या व जनतेच्या मताला महत्त्व असताना सुद्धा अशा प्रकारचे आरोप करणे म्हणजे आपला पराभव स्वीकारून मंथन चिंतन न करता मेरी मुर्गी की एक टांग असा प्रकार असल्याचा आरोप भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने यांनी केला.

भारतीय जनता पक्षाला सर्वात मोठा पक्ष म्हणून अकोलेकरांनी विश्वास व्यक्त केला. ३८ ठिकाणी तसेच महायुतीचे ४१ नगरसेवक हे विजयी केले. हे असताना लोकशाहीला न मानणारे तसेच सुप्रीम कोर्टाने काँग्रेस कोर्टात गेली असताना अकोल्याच्या टॅक्स संदर्भात दिलेला निर्णय मान्य नाही. अपप्रचार केल्यावर सुद्धा भारतीय जनता पक्षाला सर्वात जास्त जागा नागरिकांनी दिल्या. लोकशाहीमध्ये मतदारांनी दिलेला व जनादेश मान्य नसल्यामुळे अशा प्रकारे आरोप करण्यात येत आहेत. विरोधी पक्षांनी याचा विचार करावा असे जयंत मसने यांनी आरोप प्रत्यारोप संदर्भात बोलताना सांगितले.

# श्रेया वेलनेस सेंटर, न्यू लाईफ वेलनेस सेंटरच्या पुढाकाराने फिटनेस सेमिनार

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोला:** आरोग्य हीच धनसंपदा परंतु आजच्या काळात आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. प्रत्येकाच्या सभोवताली आजारपण नांदत आहे. प्रत्येक जण जीवनाच्या धकाधकीत व्यस्त आहे. आरोग्याकडे त्याचे दुर्लक्ष होत आहे. स्वतःसाठी कोणीही वेळ काढत नाही म्हणूनच आजाराने ग्रस्त असतो. स्वतःला एक तास व्यायामाच्या माध्यमातून वर्क आऊट करून घेण्याचे मोलाचे कार्य छत्रपती संभाजी नगर येथील संतोष पाटील व देवकी पाटील मॅडम यांनी सुरू केलेल्या एका रोपट्याचे रूपांतर एका मोठ्या वटवृक्षात झाले आहे. आरोग्य संदर्भात त्यांचे मोलाचे मार्गदर्शन, व्यायाम करण्याची पद्धत व शरीराला लागणाऱ्या न्यूट्रिशन बाबतचा सल्ला






अकोल्यातही मोठ्या प्रमाणात लोक घेत आहेत.

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महागुरू आरोग्य सल्लागार संतोष पाटील व देवकी पाटील मॅडम यांच्या मार्गदर्शनात वर्कआउट सेमिनार घेण्यात आले. यामध्ये अकोला शहरामध्ये कार्यरत असलेल्या श्रेया वेलनेस सेंटर, न्यू लाईफ वेलनेस सेंटर, स्माईल वेलनेस सेंटर यांच्या पुढाकाराने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अकोलेकरांना आरोग्याच्या बाबतीत व्यायामाचे महत्त्व सांगितले. व्यायाम कसा करावा, आहार कसा घ्यावा जेणे करून आजारापासून आपण लांब राहू...या कार्यक्रमा साठी आलेले महागुरू संतोष पाटील आणि देवकी पाटील मॅडम यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी संजय सोनाने सर , दिलीप गोपनारायण सर, देवलाल संदाशिव सर, दीपक सावंग सर, देवानंद तायडे सर यांनी मोलाची भूमिका पार पाडून कार्यक्रम यशस्वी केला. अकोला येथील न्यू लाईफ वेलनेस सेंटर मध्ये २७ रोजी तारखेला वर्कआउटला हजर असलेले वर्कआउट मेंबर दिलीप गोपनारायण, रूपाली गोपनारायण, नितीन गोपनारायण, सुजाता गोपनारायण, माणिकराव देशमुख, अरुण वाघ, देवयानी वाघ, रवींद्र दंदे, दंदे मॅडम, शिरसाट, वानखडे, भगत, भगत मॅडम, रायबोले मॅडम, जयस्वाल, श्रेया गवई, करुणा गवई, राजेश तायडे, संजय सोनोने, सरिता सोनोने, प्रशिक सोनोने, राजेश निखाडे, शेषराव सरदार, दीक्षा तायडे, मेघा जुमडे, किरण धोटे, विवेक धोटे, वैशाली दामोदर, प्रमोद फुकट, राजू इंगळे, नैना इंगळे, वंदना खंडारे, दीपा इंगळे, भाग्यश्री इंगळे, अजय सोळंके, सोळंके मॅडम, आराध्या सोळंके, राजेश यमगवळी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# ‘लालपरी’च्या धडकेत महिला ठार

प्रतिनिधी ३१ जानेवारी





**कळंब :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ‘लाल परी’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पांढरकवडा ते अकोला मार्गावरील बसने रस्त्याच्या कडेला चालणाऱ्या महिलेला जोरदार धडक दिल्याने तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हा भीषण अपघात आज शुक्रवारी सायंकाळी सुमारे ६.३० वाजताच्या सुमारास शेळी (खटेश्वर) परिसरात घडला.

मृत महिलेचे नाव सिंधुबाई भीमराव सखापुरे (वय ४५) असे आहे. त्या खैरी (ता. कळंब, जि. यवतमाळ) येथील रहिवासी होत्या. पांढरकवडा आगारातून सायंकाळी ४.३० वाजता निघालेल्या बसचा क्रमांक MH १४ MH १४८५ असून, ही बस पांढरकवडा डेपोची आहे.

रस्त्याच्या कडेला चालत असताना अचानक बसने धडक दिल्याने महिला दूर फेकल्या गेल्या. गंभीर जखमांमुळे त्यांचा तात्काळ मृत्यू झाला. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली; स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.

घटनेची माहिती मिळताच यवतमाळ ग्रामीण पोलीस स्टेशनचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

पोलिसांनी बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून अपघाताचे नेमके कारण तपासण्यास सुरुवात केली आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीनेही याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

**महत्त्वाचे मुद्दे**

- ‘लाल परी’ बसने पादचारी महिलेला जोरदार धडक
- सिंधुबाई सखापुरे (४५, खैरी) यांचा जागीच मृत्यू
- अपघात शेळी (खटेश्वर) दरम्यान; सायंकाळी ६.३० वाजता
- बस क्रमांक MH १४ MH १४८५ (पांढरकवडा डेपो)
- पोलिसांकडून चालकाविरुद्ध कारवाई; तपास सुरू

# बीएसएनएल कार्यालयात प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणच नाही; माजी नगरसेवकांची पोलिसांत तक्रार

प्रतिनिधी ३१ जानेवारी




**उमरखेड :** येथील भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) कार्यालयात प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी) ध्वजारोहण न झाल्याचा प्रकार समोर आला असून, याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी माजी नगरसेवक संदीप गणपत ठाकरे यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

दरवर्षी २६ जानेवारी रोजी देशभरात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयांमध्ये ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली जाते. मात्र, उमरखेड येथील बीएसएनएल कार्यालयात हा राष्ट्रीय कार्यक्रमच पार पडला नसल्याचे निदर्शनास आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक संदीप ठाकरे यांनी ३० जानेवारी रोजी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत केली आहे.

या घटनेमुळे नागरिकांमध्ये आश्चर्य व्यक्त करण्यात येत असून, शासकीय स्वरूपाच्या कार्यालयात असा प्रकार कसा घडू शकतो, याबाबत चर्चेला उधाण आले आहे.

तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांकडून चौकशी सुरू होण्याची शक्यता असून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## गळफास घेवून शिक्षिकेची आत्महत्या

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**वणी :** उच्चशिक्षित व महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षिकेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना वणी शहरानजीकच्या चिखलगाव येथील महादेव नगर परिसरात घडली. युगंधरा स्वप्नील खरबडे (वय ३५) असे मृत शिक्षिकेचे नाव आहे. पती कामानिमित्त बाहेर गेल्यानंतर सायंकाळी घरी परतल्यावर ही घटना उघडकीस आली. वणी पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवला. आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

# विद्यार्थीनीची छेडछाड; रोडरोमिओवर पोक्सो अंतर्गत गुन्हा

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**उमरखेड :** शाळेत जात असताना अल्पवयीन मुलीची छेडछाड केल्याप्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात २० वर्षीय तरुणाविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी घटना घडताच फरार झाला आहे.

पप्पू आढाव (वय २०) असे आरोपीचे नाव आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उमरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इयत्ता आठवीत शिकणारी अल्पवयीन मुलगी ही सकाळी शाळेत जाण्यासाठी घरातून निघाली होती. आरोपी पप्पू आढाव याने तिच्या घराजवळ येऊन हातवारे करत अश्लील इशारे केले. मात्र पीडितेने त्याकडे दुर्लक्ष केले.

यानंतर सकाळी साडेनऊच्या सुमारास पीडिता आपल्या वर्गमैत्रिणीसोबत शाळेच्या बसची वाट पाहत असताना आरोपी तेथे आला.

“तू मला खूप आवडतेस, पण प्रतिसाद देत नाहीस,” असे म्हणत त्याने पीडितेजवळ येऊन अंगाशी लगट करण्याचा प्रयत्न केला.

पीडितेने त्याला ढकलले असता आरोपीने तिला चापट मारून पुन्हा जवळ येण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे पीडितेला लज्जा व भीती वाटली.

घाबरलेल्या अवस्थेत पीडिता जवळच असलेल्या एका घरात गेली व तेथील मोबाईलवरून तिने आपल्या वडिलांना घटनेची माहिती दिली. दरम्यान, आरोपी घटनास्थळावरून पळून गेला.

यानंतर पीडितेने आई-वडिलांसह उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध सुरू असून पुढील तपास उमरखेड पोलीस करीत आहेत.

# वृद्ध शेतकऱ्याने शेतातच केले विष प्राशन

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**पांढरकवडा :** शेतीतील सततची नापिकी व कर्जाच्या ओझ्यामुळे तालुक्यातील खैरगाव (बुजरूख) येथे एका ६५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केली.

शाहू नामा राठोड (वय ६५) हे आपल्या तीन एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. दि. २७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ते नेहमीप्रमाणे शेतात कामासाठी गेले होते. सायंकाळी सात वाजता घरी परतल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडलेली दिसली. ते खाटेवर झोपले.

मुलगा सुनील शाहू राठोड (वय ३५) यांनी विचारपूस केल्यावर शाहू यांनी सांगितले, ‘‘मी शेतीच्या कर्जाला पूर्णपणे कंटाळलो आहे. शेतात विष घेतले आहे.’’

हे ऐकताच मुलाने तात्काळ गावातील गौरव भोयर यांची चारचाकी गाडी मागवून वडील आणि आई कमल राठोड यांच्यासह त्यांना उपचारासाठी उमरी येथील ख्रिश्चन हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तेथे तीन दिवस उपचार सुरू होते. मात्र, दि. ३० जानेवारी २०२६ रोजी रात्री उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

मृताचा मुलगा सुनील राठोड याने पोलिस ठाण्यात जाऊन जबानी नोंदवली असून, वडिलांच्या मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे आणि कोणाविरुद्ध तक्रार नसल्याचे स्पष्ट केले आहे. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ३१ जानेवारी




**पांढरकवडा :** लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर दीड वर्षांपासून लैंगिक अत्याचार करणाऱ्या तरुणाला पांढरकवडा पोलिसांनी अवघ्या काही तासांत अटक केली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता, पोक्सो कायदा तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पीडित मुलगी ही पांढरकवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात वास्तव्यास आहे. तिची आरोपी किरण हुसेन बोरकर (वय २०, रा. पांढरकवडा) याच्याशी जुलै २०२४ पासून ओळख होती. या ओळखीचा गैरफायदा घेत आरोपीने “आपण लग्न करू” असे आमिष दाखविले. पीडितेच्या घरी किंवा स्वतःच्या घरी कोणी नसताना वारंवार शारीरिक अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

हा प्रकार दीड वर्षांपासून सुरू होता. दरम्यान, २९ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास आरोपीने मद्यधुंद अवस्थेत पीडितेशी वाद घालून तिला मारहाण केली. या सततच्या छळाला कंटाळून पीडितेने अखेर ३० जानेवारी रोजी पांढरकवडा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

पीडितेच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध अपराध क्रमांक १३६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ६४, ६४(२)(m), ६५(१), ११५(२) तसेच पोक्सो कायदा कलम ४ व ६ आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा कलम ३(२)(va) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेऊन काही तासांतच त्याला ताब्यात घेण्यात आले.

ही कारवाई यवतमाळचे पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पांढरकवडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या सूचनेनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पेंढारकर व पोलीस शिपाई विकेश ध्यावर्तीवार यांनी ही यशस्वी कारवाई केली. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल करीत आहेत.

# पुसदमध्ये नालीत वृद्ध महिलेचा मृतदेह आढळला

## अपघात की घातपात याबाबत शंका, पोलिसांचा तपास सुरु



प्रतिनिधी ३१ जानेवारी

**पुसद :** शहरातील वार्ड क्रमांक दोनमधील लहान पुलाजवळील नालीत एका वृद्ध महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. हा मृत्यू अपघाती की घातपाताचा, याबाबत नागरिकांकडून शंका व्यक्त केल्या जात आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर महिला गेल्या तीन दिवसांपासून नालीत पडलेली होती. दुर्गंधी येऊ लागल्यानंतर नागरिकांनी पाहणी केली असता मृतदेह आढळून आला. मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब असून ओळख पटविणे अवघड आहे. दरम्यान, २५ जानेवारी रोजी सिंधुबाई सखाराम चिंतावार (७८) या महिलेबाबत हरविल्याची तक्रार पुसद पोलीस ठाण्यात दाखल होती. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# मिताली समीक्षा अंश राज्य खो-खो संघात

प्रतिनिधी ३१ जानेवारी







**यवतमाळ :** स्थानिक नवजयहिंद क्रीडा मंडळाच्या तीन खेळाडूंची राज्य खो खो संघामध्ये निवड झालेली आहे नुकत्याच अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे संपन्न झालेल्या विदर्भ स्तरीय सब ज्युनिअर राज्य अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेमध्ये नवजयहिंद क्रीडा मंडळाने यश प्राप्त केले होते.

या स्पर्धेमधून महिला विद्यालयाची विद्यार्थिनी मिताली विनोद वाघमारे व अभ्यंकर कन्या शाळेची विद्यार्थिनी समीक्षा राजेश खेत्री तसेच लोकनायक बापूजी अणे विद्यालयाचा विद्यार्थी अंश विजेंद्र उफाडे यांची विदर्भ खो-खो संघामध्ये निवड झालेली आहे वरील खेळाडू काटोल येथे सुरू असलेल्या सराव शिबिराकरिता रवाना झाले आहे. दिनांक 29 ते 4 फेब्रुवारी रोजी हरियाणा मधील रोहतक येथे होणाऱ्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेमध्ये हे सहभागी होणार आहे.

वरील खेळाडू आपल्या यशाचे श्रेय आपले आई-वडीलशाळांचे मुख्याध्यापक तसेच नवजयहिंद क्रीडा मंडळाचे प्रदीप वानखेडे, बाळासाहेब दौलतकार, अमोल बोदडे, कैलास शिंदे तसेच यवतमाळ जिल्हा खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद घावडे सचिव विकास टोणे व प्रशिक्षक अविनाश जोशी, पंकज रोहनकर यांना देतात. यांच्या या यशाबद्दल मंडळाचे अमोल ढोणे जम्मू लालूवाले, आशिष प्यारलेवार, शैलेश मुंडे, जीत पांडे राहुल ढोणे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# स्व.अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

प्रतिनिधी ३१ जानेवारी



**आर्णी :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आर्णी येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. सामाजिक युवा कार्यकर्ते व पत्रकार परवेज बेग यांच्या पुढाकारातून परवेज बेग मित्र परिवाराच्या वतीने ही श्रद्धांजली सभा पार पडली.

स्व. अजितदादा पवार यांच्या विमान अपघातातील दुःखद निधनाने सर्वत्र शोककळा पसरली असून, त्यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करण्यासाठी शहरातील राजकीय, सामाजिक, व्यापारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी स्व. अजितदादा पवार यांच्या कार्याची, नेतृत्वगुणांची व सामाजिक योगदानाची आठवण करून दिली. राज्याच्या राजकारणात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला. या श्रद्धांजली सभेला राजेश श्रीवास, संतोष श्रीवास, आबीद फानन, प्रमोद कुदळे, बबलू जाधव, ॲड. जावेद शेख, ॲड. राहुल ढोरे, राहुल पोडूटवार, साबीर शेख, इंजि. इमरान सय्यद, पूजा ढाले, बबीता शिवणकर, नौशाद अली सय्यद, शुभम डोल्हारकर, सुलेमान फाजलानी, शेख साबीर, संजू गावंडे, मो. शाकीर, अरबाज मिर्झा, राजु मलनस, सोहेल चव्हाण, अफताब मिर्झा, आवेज बेग, महेंद्र ढाले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# शेगाव येथे होणार विदर्भस्तरीय शिक्षक मेळावा

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**यवतमाळ :** राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या ज्वलंत विषयांवर चर्चा करून त्यावर प्रभावी उपाययोजना करता यावी म्हणून विदर्भस्तरीय शिक्षक मेळावा ३१ जानेवारी १ फेब्रुवारी २०२६ रोजी संतनगरी शेगाव (जि. बुलढाणा) येथील गणेश प्रस्थ मंगल कार्यालयामध्ये आयोजित करण्यात आलेला आहे.

या मेळाव्यामध्ये राज्यातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करावी, राज्यातील आयटीआय निदेशकांच्या विविध समस्या, टीईटी संदर्भात शासनाचे धोरण व त्याबाबत शिक्षकांमध्ये असलेला संभ्रम, राज्यातील आदिवासी आश्रम शाळामधील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या, टप्पा वाढ अनुदान, नक्षलग्रस्त, आदिवासी भागामध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना एक स्तर पदोन्नती व वाढीव घरभाडे भत्ता लागू करण्यात यावा तसेच १५% नक्षलग्रस्त भत्ता सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार अदा करण्यात यावा, अंशतः अनुदानित शाळा तुकडीवर कार्यरत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सवलत, अर्जित रजा रोखीकरण व शाळेला वेतनेत्तर अनुदान मंजूर करणे, याशिवाय शिक्षक कर्मचाऱ्यांची प्रलंबित असलेली विविध देयके शालार्थ आयडी प्रकरणे, अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती तसेच त्यांचे शालार्थ आयडी प्रकरणे, विनाअनुदानित तुकडी वरून अनुदानित अनुदानित तुकड्यावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे या व अशा अनेक समस्यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

३१ जानेवारीला सायं. ५ वाजता कार्यकर्ता परिसंवाद होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुधाकर अडबाले, उद्घाटक म्हणून माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, तर परिसंवादावर वक्ते म्हणून दिलीप कडू, जयदीप सोनखासकर, राजेश खडबडे, प्रमोद मुनेश्वर, रामदास खवशी मार्गदर्शन करणार आहेत.

१ फेब्रुवारी २०२६ रोजी विदर्भस्तरीय शिक्षक मेळाव्याचे उद्घाटन तथा संघर्ष स्मरणिका प्रकाशन समारंभ सकाळी ११.३० वाजता होणार आहे.

या शिक्षक मेळाव्याला उद्घाटक म्हणून आमदार धीरज लिंगाडे, अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सरचिटणीस तथा माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, मार्गदर्शक म्हणून विमाशि संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले, स्मरणिका प्रकाशन शुभहस्ते आमदार संजय खोडके, स्वागताध्यक्ष म्हणून माऊली ग्रृपचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, प्रमुख पाहूणे म्हणून आमदार ॲड. अभिजीत वंजारी, आमदार रामदास मसराम, विमाशि संघाचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, मेस्टाचे राज्याध्यक्ष डॉ. संजय तायडे पाटील, महा. राज्य आयटीआय निदेशक संघटनेचे सल्लागार भोजराज काळे, महाराष्ट्र आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्य सरचिटणीस किसन पुंड, आदिवासी आश्रम शाळा शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे राज्याध्यक्ष वितेश खांडेकर, राज्य सरचिटणीस आशुतोष चौधरी व अमरावती शिक्षक मतदार संघाचे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघटनेचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू आदी मान्यवर उपस्थित राहणार असून मार्गदर्शन करणार आहे.

या मेळाव्यादरम्यान नागपूर विभागाचे शिक्षक आमदार तसेच संघटनेचे सरकार्यवाह श्री. सुधाकर अडबाले यांनी मागील तीन वर्षांमध्ये शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेले भरीव कार्य यावर 'संघर्ष' या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे.

या शिक्षक मेळाव्यामध्ये दिग्गज शिक्षक आमदाराचे मौलिक मार्गदर्शन मिळणार असल्याने विदर्भातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे प्रांतिय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, जयदीप सोनखासकर, विजय ठोकळ, विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, चंद्रशेखर रहांगडाले, कोषाध्यक्ष भूषण तल्हार यांच्यासह जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# बिटरगाव पोलिसांकडून 'दंगा काबू' योजनेचे थरारक प्रात्यक्षिक

## कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दल सज्ज

प्रतिनिधी ३१ जानेवारी



**उमरखेड :** आगामी सण-उत्सव आणि सार्वजनिक शांततेच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी बिटरगाव पोलीस ठाण्याने 'दंगा काबू' योजनेचे यशस्वी आणि थरारक प्रात्यक्षिक सादर केले. या माध्यमातून पोलिसांनी हिंसक जमावावर नियंत्रण मिळवण्याची तयारी आणि शिस्तबद्ध कार्यपद्धती दाखवून दिली.

पोलीस ठाण्याच्या परिसरातच एक काल्पनिक दंगलीचे दृश्य उभे करण्यात आले होते. सुरुवातीला जमावाने केलेली घोषणाबाजी, त्यानंतर सौम्य लाठीचार्ज आणि तरीही जमाव पांगला नाही तर अश्रूधुराच्या नळकांड्यांचा (टियर गॅस) वापर कसा करावा, याचे प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले.

या प्रात्यक्षिकात शिस्तबद्ध कार्यवाहीचा विशेष भर देण्यात आला. कमीत कमी बळाचा वापर करून परिस्थिती हाताळण्याचे तंत्र दाखवले गेले. दंगल नियंत्रण पथकाकडे असलेल्या ढाली, हेल्मेट, लाठी आणि अश्रूधुराच्या गनची कार्यक्षमता तपासण्यात आली. तसेच, घटनेची माहिती मिळताच पथक किती वेळात घटनास्थळी पोहोचते आणि योग्य 'पोझिशन' घेते, याचीही चाचणी घेण्यात आली.

"नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस दल सदैव तत्पर आहे. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखावी. कायदा हातात घेणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यास आम्ही सज्ज आहोत," असे मत पांडुरंग शिंदे, ठाणेदार, बिटरगाव पोलीस ठाणे यांनी व्यक्त केले.

या प्रात्यक्षिकामुळे बिटरगाव पोलीस दलाची सतर्कता आणि तयारी स्पष्टपणे दिसून आली. स्थानिक नागरिकांनीही पोलिसांच्या या अत्यंत उपयुक्त सरावाचे आणि सज्जतेचे कौतुक केले आहे. आगामी काळात सण-उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी ही तयारी महत्त्वाची ठरली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## ब्रम्हा येथे दारूबंदी, ९ फेब्रुवारी रोजी मतदानातून संधी

**वाशीम :** तालुक्यातील मौजे ब्रम्हा, येथे असलेल्या ऋषी रेस्टॉरंट ॲण्ड बाईन बार यांची मद्यविक्रीची अनुज्ञप्ती बंद करावी अथवा नाही, याबाबत दारूबंदी निवडणूक घेण्यात येणार असून, ही निवडणूक दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिलेल्या आदेशान्वये सदर मतदान प्रक्रिया राबविण्यासाठी वाशिम तहसिलदार निलेश पळसकर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. तसेच तहसिलदार, वाशिम यांचे आदेश क्रमांक जा.क्र. म.स./सा.नि./कावि/२४/२०२६, दिनांक २३ जानेवारी २०२६ अन्वये नायब तहसिलदार, ही.एस.आडे यांना निवडणूक प्रक्रियेची जबाबदारी देण्यात आली आहे. मतदानाची वेळ सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. मतमोजणी दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ब्रम्हा येथे होणार असून, निकाल तात्काळ जाहीर करण्यात येणार आहे.





# गरीब-श्रीमंताचे अंतर, मजुरांचे पोटासाठी स्थलांतर !

## गावेच्या गावे पडली ओस



●रमेश मुंजे @मंगरूळपीर●

**तालुक्यातील पोलीस स्टेशन आसेगाव अंतर्गत येत असलेल्या डोंगराळ भागातील सोयाबीन सोंगणीचा हंगाम झाल्यानंतर मजुराच्या हाताला काम नसल्यामुळे पोटाची खळगी भरण्यासाठी मजुराचे थवेच्या थवे ऊस तोडणी व कापूस वेचणी वर गेल्यामुळे गावे उजाड पडली आहे.**

आसेगाव भागातील गावामध्ये रोजगार हमी योजनेचे कोणत्याच प्रकारे काम सुरू नसल्यामुळे व सोयाबीन सोंगणीचा हंगाम झाल्यानंतर मजुराच्या हाताला कोणत्याच प्रकारे काम नसल्यामुळे टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी काम नसल्यामुळे या भागातील पिंपळगाव, वसंतवाडी रुई, गोस्ता सनगावं, वटफळ शेंगी, भडकुंभा, खापरदरी इत्यादी गावातील मजुराचे स्थलांतर मराठवाड्यात पश्चिम महाराषष्ट्रात उसाच्या कारखान्यावर तसेच वर्धा जिल्ह्यामध्ये कापूस वेचणीवर गेल्यामुळे गावे चा गावे उजाड पडली आहे. उसाच्या कारखान्यावर काम करण्यासाठी गेल्यामुळे त्यांच्या काहीसा प्रश्न मिटला आहे मजूर ऊस तोडणी वर गेल्यामुळे त्यांच्या लहान मुलाला सांभाळण्या साठी घरी कोणीच नसल्यामुळे शाळेतील मुलांना सुद्धा सोबत घेऊन गेले आहेत तसेच काही मजुरांनी वयोवृद्ध आई-वडिलांना गावामध्ये शेजारच्या भरोशावर ठेवून काम करण्यासाठी जावे लागले या भागातील मोठ्या प्रमाणात मजुराचे स्थलांतर झाल्यामुळे गावाच्या गावे उजाड पडली आहे. डोंगराळ भागातील मजुराच्या स्थलांतरामुळे जिल्हा परिषद शाळेतील मुलाचे भविष्य अंधारी पडले आहे मजुराच्या हाताला गावामध्ये जर रोजगार हमीचे काम मिळाले असते तर गावे उजाड झाली नसती व मुलाचे भविष्य सुद्धा घडले असते परंतु गावामध्ये मजुराच्या हाताला काम नसून शेती सिंचनाची व्यवस्था नसल्याने मजुराला दुसरा पर्याय नाही तसेच जि प शाळेतील काही मुले मुली आई-वडिलांनी शेजाऱ्याच्या भरोशावर ठेवले असले तरी त्यांना गावातील सामाजिक कार्यकर्त्यांनी व शासनाने मदतीचा हात द्यावा तेव्हा त्या मुलांना आई वडील सोडून गेल्याचे दुःख वाटणार नाही असे सहकार्य करावे, तरी शासनाने मजुराचे स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजनेचे काम उपलब्ध करून देण्याचे मागणी या भागातील नागरिक सुभाष कावरे डॉ. भगवान भेंडेकर गोपाल संगेकर गजानन खोटे ,अनिकेत फड ओमप्रसाद फड ,भास्कर चौधरी ,विष्णू फड भास्कर दिनकर भांडेकर इसरार महमद खान ,शेख रहीम शेख मुसा, गोविंदा चौधरी प्रकाश भिसे सह सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

## थोडक्यात

### नाथ नगरीत ठीक ठिकाणी प्रजासत्ताक दिन साजरा





●सिटी न्यूज ब्युरो @ मंगरूळपीर●

नाथ नगरीत यावर्षी २६ जानेवारी ७७ वा प्रजासत्ताक दिन अभिमानाने आणि उत्साहाने साजरा करत आहे भारताचा प्रजासत्ताक दिन दरवर्षी २६ जानेवारी रोजी साजरा केला जातो या दिवसाला देशाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे हा दिवस अभिमान आणि सार्वभौमत्वाचे प्रतीक आहे १९५०साली याच दिवशी भारताची राज्यघटना लागू झाली आणि भारत हा सर्वभौम समाजवादी. धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक बनला राज्यघटने द्वारे राष्ट्राने स्वतःचे शासन करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकले या प्रजासत्ताक दिनानिमित्त मंगरूळपीर नगरीत ठीक ठिकाणी झेंडावंदन करून उत्सा पाहण्यात आला यामध्ये दिवाणी व फौजदारी न्यायालय मा. श्री वैभव पाटील जिल्हा न्यायाधीश .श्री के एच ठोंबरे थदतर न्यायाधीश .श्री धनंजय अंभोरे दिवाणी न्यायाधीश .श्री के सी कलाल साहेब न्यायाधीश .श्री एम डी तारे न्यायाधीश. प्रभारी अधीक्षक अक्रम साहेब. एस बी कोळकर .के एस भोजापूर .आर्यन सोनटक्के .मोहम्मद अकबर .तसेच विधीतज्ञ बार असोसिएशनचे अध्यक्ष पांडे साहेब. बार असोशियनचे उपाध्यक्ष विधीतज्ञ बोलके साहेब. विधीतज्ञ मुळे साहेब. ? सामाजिक बांधकाम विभाग उपविभागीय अधिकारी चेके साहेब . अभियंता वानखडे .अभियंता पवार. अभियंता पाचपोरे .तसेच ? तालुका दंडाधिकारी तहसीलदार साहेब मंगरूळपीर श्री सुधाकर अनासपुरे. निवासी तहसीलदार रवी भाऊ राठोड. महसूल तहसीलदार पतंगे साहेब.? पंचायत समिती गटविकास अधिकारी अवगण साहेब कक्ष अधिकारी वाघमारे साहेब तसेच मंडळीचा सहभाग व उपविभागीय जलसंधारण अधिकारी एल बी सदापुरे मैडम.श्री एम जी तायडे जलसंधारण अधिकारी. व एकात्मिक बालविकास मंडळ फाले मॅडम सी डी पी ओ .दहापुते विस्तार अधिकारी .राठोड साहेब क्लाक. 'मैथिली मॅडम सुपरवायझर. लता उखंडा चव्हाण सुपरवायझर. तसेच लघु पाटबंधारे उपविभाग श्री का.म.सत्तीवाले सहाय्यक कार्यकारी अभियंता. नितीन मेहरत उपविभागीय अभियंता. अभिषेक नलावडे शाखा अभियंता. या संपूर्ण शासकीय ऑफिसमध्ये झेंडावंदन करून प्रियजनांना शुभेच्छा दिल्या देशप्रति देशभक्ती वाढवू शकतात हा उद्देश देण्यात आला.





## रिसोड तालुक्यात अवैध वाळू - मुरूम वाहतूक राजरोस...

# अधिकारी बनले हप्तेखोर, तस्कर झाले मुजोर!

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये म्हणून, गौण खनिज उत्खनन करण्यावर प्रशासनाकडून अंकुश ठेवण्यात आला आहे. परिणामी रेती, मुरूम उत्खननावर महसूल विभाग विशेष पाळत ठेवून, अवैध वाळू वाहतुकीवर धडक कारवाई करत आहे. मात्र मराठवाड्याच्या सीमेवर असलेला रिसोड तालुका आजमितीस रेती तस्करीचे केंद्रबिंदू बनला आहे. महसूलचे अधिकारी आणि कर्मचारी हप्तेखोर बनल्यामुळे काही मर्जीतले तस्कर मुजोर झाले असल्याची चर्चा रिसोड तालुक्यात सुरू आहे. विशिष्ट दलालांमार्फत हप्ते घरपोच मिळत



असल्याने प्रशासकीय यंत्रणा मिन्धी झाली असल्याचे सर्व साधारण जनता बोलत आहे. त्यामुळे रेतीचे भाव मात्र आकाशाला भिडले असून गोरगरिबांच्या ' घरकुल ' बांधकामांना ' ब्रेक' लागला आहे. या गंभीर बाबीकडे जिल्हा प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी जोर धरत आहे.

रिसोड तालुक्याला लाभलेल्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर'यांनी सुरुवातीच्या काळात अवैध गौण खनिज उत्खनन व वाळू वाहतुकीवर जोरदार कारवाई करत महसूल विभागाची 'कडक नजर' दाखवून दिली होती. त्या काळात अवैध वाळू वाहतूकदारांमध्ये धडकी भरली होती. मात्र सध्या चित्र पूर्णपणे बदलले असून, शहर व तालुक्यात अवैध वाळू-मुरूम वाहतुकीचे घोडे खुलेआम नाचत असल्याचे विदारक वास्तव समोर येत आहे.शहरातून रात्रीच्या काळोखातच नव्हे, तर आता चक्क दिवसाढवळ्या 'काही विशिष्ट' नावाचे टिप्पर अति सुसाट वेगाने अवैध वाळू वाहतूक करत असल्याचे नागरिकाकांकडून सांगण्यात येत आहे.या टिप्परचा वेग इतका प्रचंड असतो की रस्त्यावर चालणाऱ्या नागरिकांच्या जीवाला सतत धोका निर्माण होत आहे. अपघात कधीही होऊ शकतो, अशी भीती नागरिकांमध्ये आहे.इतके असूनही या मुजोर वाळू वाहतुकीकडे रिसोड महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे.खुलेआम अनेक ट्रॅक्टरद्वारे मुरूम वाहतूक होत असल्याचे चित्र आहे. महसूल विभागाला 'मलिदा' पोहोचत असल्यानेच हे अवैध उत्खनन निर्बाध सुरू असल्याची चर्चा शहरात रंगू लागली आहे.तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांचा सुरुवातीचा जो दबदबा होता, तो आता पूर्णतः कमी झाल्याचे दिसत आहे. महसूल विभाग हप्त्यापोटी थंडावल्याने वाळू-मुरूम माफियांना मोकळे रान मिळाले असून, ते खुलेआम शहरातून अवैध वाहतूक करत आहेत.



### धनदांडग्या रेती तस्करांना नेमके कोणाचे अभय?

अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांची संपूर्ण माहिती महसूल विभागाकडे असूनही कारवाई होत नसल्याने, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वाळू माफियांशी धागेदोरे असल्याची जोरदार चर्चा रिसोड तालुक्यात रंगत आहे.कधी काळी अवैध रेती वाहतुकीसाठी 'कर्दनकाळ' ठरलेल्या तहसीलदारांची प्रतिमा आता धूसर होत चालली आहे. कुठेतरी 'थंड पाणी' मुरल्यानेच वाळू व अवैध उत्खनन माफियांना सूट दिली जात आहे .

## बेलखेड, पिंपळगाव शिवारात शेतकऱ्यावर रानडुकराचा जबर हल्ला !

●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●



बेलखेड व पिंपळगाव शिवारात रानडुकराने अचानक केलेल्या जबर हल्ल्यात पती-पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवार दि.३० जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली.

या घटनेमुळे संपूर्ण बेलखेड गावामध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.प्रवीण अंबादास मिरासे वय ४५ वर्ष व वृंदा प्रवीण मिरासे वय ४० वर्ष रा. बेलखेड हे पती-पत्नी सकाळच्या सुमारास शेतामध्ये कामासाठी गेले असता गजानन भगत व दिवाकर हिंगणकर यांच्या शेतात दबा धरून बसलेल्या रानडुकराने अचानक त्यांच्यावर हल्ला केला.या हल्ल्यात दोघांनाही शरीरावर गंभीर जखमा झाल्या.

हल्ल्यानंतर आरडाओरड झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी धाव घेत जखमी दाम्पत्याला तात्काळ ग्रामीण रुग्णालय, कामरगाव येथे प्रथम उपचार करून पुढील उपचारा साठी एम एच १४ सी एल १०२०,१०८ रुग्णवाहिका तसेच ग्रामीण रूग्णालय कामरगाव १०२ रुग्णवाहिकेने अमरावती येथे पाठवण्यात आले आहे.

## कन्यारत्न जन्माचं उत्साहात स्वागत व्हायला हवं - जिल्हाधिकारी

### बेटी बचाओ बेटी पढाओ जिल्हा कृती दल आणि पीसीपीएनडीटी जिल्हा दक्षता समिती आढावा सभा

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रमाअंतर्गत स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी तसेच गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदानतंत्र कायदा १९९४ (सुधारित २००३) याची जिल्ह्यात काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली बेटी बचाओ बेटी पढाओ जिल्हा कृती दल आणि पीसीपीएनडीटी जिल्हा दक्षता समिती आढावा सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. सभेला जिल्हा विधी सेवा प्रधिकरणाचे सचिव न्या. व्ही.जी.चौखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, महिला व बालकल्याण उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पी.एस.ठोंबरे, महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा अलका मकासरे , परिविक्षाधीन अधिकारी गणेश ठाकरे,यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते. जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी प्रत्येक प्रसूतीगृहात जन्माला येणाऱ्या कन्यारत्नांच्या जन्माचे उत्साहात स्वागत करण्यात यावे. यावेळी कुटुंबीयांचे अभिनंदन करून मुलींच्या जन्माचे व शिक्षणाचे महत्त्व सकारात्मक पद्धतीने समजावून सांगण्यासाठी समुपदेशन करावे. बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रमाची व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

## जिल्ह्यातील ५३ मोजणी प्रकरणांचा...

# विशेष मोहिमेतून एका दिवसात निपटारा !





●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील ९० दिवसांपेक्षा प्रलंबित असलेली एकूण ५३ मोजणी प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष मोजणी मोहिम यशस्वीपणे राबविण्यात आली.

ही मोहिम उप अधीक्षक भूमि अभिलेख वाशिम, मंगरुळपिर, कारंजा, रिसोड व मानोरा या कार्यालयांमार्फत दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी पार पडली. मोहिमेमध्ये एकूण ५३ मोजणी कर्मचारी सहभागी झाले असून २४ रोव्हर मशीनचा प्रभावी वापर करण्यात आला.मोहिमेसाठी दोन मोजणी कर्मचारी यांची एक टीम तयार करून प्रत्येक टीमला एक रोव्हर मशीन देण्यात आले.


प्रत्येक टीमला लगतच्या गावांतील दोन मोजणी प्रकरणे मोजणी कामासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वाटप करण्यात आली होती.या विशेष मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी दि. २२ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख श्रीमती शिल्पा सानप यांनी जिल्ह्यातील सर्व उप अधीक्षक भूमि अभिलेख यांची प्रत्यक्ष बैठक घेऊन आवश्यक सूचना दिल्या.

तसेच दि. २३ जानेवारी २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांची ऑनलाईन बैठक घेऊन त्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.दि. २४ जानेवारी २०२६ रोजी ज्या प्रकरणांमध्ये मोजणी करण्यात आली, त्या सर्व प्रकरणांमध्ये त्याच दिवशी हद्द कायम करण्याच्या सूचना संबंधित मोजणी कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. या विशेष मोजणी मोहिमेत एकूण ५३ मोजणी प्रकरणांची मोजणी कार्यवाही पूर्ण करून सर्व प्रकरणे त्याच दिवशी निकाली काढण्यात आली.यासाठी भूमी अभिलेखच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला.

## बुलेटचा माज उतरवला; कायद्याचा धाक दाखवला !

### रिसोड पोलीसांची फटाके फोडणाऱ्या बुलेटवर कारवाई

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●



रिसोड पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक २९ जानेवारी २०२६ व ३० जानेवारी २०२६ रोजी विशेष मोहीम राबवून कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या प्रकारांवर कडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत फटाके फोडणाऱ्या बुलेट दुचाकींवरील सायलेंसर काढून संबंधित वाहनचालकांवर ४,५०० रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच विना परवाना वाहन चालविणाऱ्या १० अल्पवयीन मुलांवर व त्यांच्या पालकांवर कारवाई करून एकूण ५०,००० रुपये दंड वसूल करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक, मा. अपर पोलीस अधीक्षक, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक, वाशीम यांच्या मार्गदर्शनाखाली रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस हवालदार मनोहर वानखडे, पोलीस नाईक सुधाकर सोन्नर, पोलीस हवालदार विलास गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल कपिल घुगे व पोलीस कॉन्स्टेबल दिलीप जाधव यांनी सहभाग घेतला. कायदा व वाहतूक नियमांचे उल्लंघन सहन केले जाणार नसून, अशा प्रकारच्या मोहिमा पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे.


सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# महाराष्ट्राच्या राजकारणातील अजित पर्वाचा अस्त !



# अकोल्यात अजितदादांना सर्वपक्षीय भावपूर्ण श्रद्धांजली





प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोला :** महाराष्ट्राच्या राजकारणातील जनतेचा खरा कैवारी, लोकहितासाठी अखंड झटणारा नेता आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. अजितदादा पवार यांच्या निधनाने केवळ एका राजकीय नेत्याचा अंत झाला नाही, तर महाराष्ट्राच्या तेरा कोटी जनतेचा आधारवड हरपला आहे, अशा शब्दांत खासदार अनुप धोत्रे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस महानगर अध्यक्ष विजय देशमुख यांच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी जठारपेठ येथील शगुन मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या सर्वपक्षीय शोकसभेत ते बोलत होते. यावेळी उपस्थित प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू तर मनात अपार शोक दिसून येत होता.

खा. धोत्रे म्हणाले, 'अजितदादांच्या निधनाने महाराष्ट्राच्या डोळ्यांत जे अश्रू आले, ते त्यांच्या कार्यशैलीमुळे, लोकहितासाठी त्यांनी केलेल्या अमूल्य कामामुळे आहेत. लोकांसाठी आग्रही असलेला, प्रशासनावर ठोस पकड असलेला नेता हीच अजितदादांची खरी ओळख होती.' ते पुढे म्हणाले, 'राजकारणातील अनेक नेतेसुद्धा त्यांच्या शब्दापुढे नतमस्तक होत. अजितदादा हे खऱ्या अर्थाने अजातशत्रू होते.'

यावेळी बोलताना आमदार नितीन देशमुख यांनी अजितदादांच्या आठवणींना उजाळा दिला. 'अजितदादांमुळेच मी पुन्हा आमदार झालो. त्यांनी पाणीपुरवठा योजना पुनर्जीवित केली नसती, तर ग्रामीण भाग आजही तहानलेला राहिला असता,' असे ते भावूक होत म्हणाले. आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले की, 'अजितदादांकडे काम घेऊन गेल्यावर त्यांनी कधी पक्ष, जात किंवा पद विचारले नाही. लोकप्रतिनिधी लोकांची कामे घेऊन आले आहेत, ती झालीच पाहिजेत, हा त्यांचा ठाम निर्धार होता.' अजितदादांच्या अकाली निधनाने केवळ राष्ट्रवादी काँग्रेसचे नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे अपूरणीय नुकसान झाले असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

विरोधी पक्षातील आमदार असतानाही अजितदादांनी निधी कमी पडू दिला नाही, अशी आठवण आमदार साजिद खान पठाण यांनी सांगितली.माजी आमदार अजहर हुसेन यांनी 'लोकहितासाठी झटणारा नेता गेला,' अशी हळहळ व्यक्त केली. अकोल्याच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन अजितदादांनी दिल्याचे विजय अग्रवाल यांनी नमूद केले. 'अजितदादांच्या जाण्याने निर्माण झालेली ही पोकळी कोण भरून काढणार?' हा प्रश्न शोकसभेत उपस्थित प्रत्येकाच्या मनात दाटून आला होता. यावेळी अजितदादांच्या प्रतिमेला पुष्पहार, गुलाब पाकळ्या अर्पण करत अकोल्यातील सर्वपक्षीय दिग्गज नेत्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. राष्ट्रवादी महानगर अध्यक्ष विजय देशमुख यांनी, 'अजितदादांच्या निधनाने आम्ही पूर्णतः खचून गेलो आहोत,' असे सांगत अश्रूंनी श्रद्धांजली वाहिली.









या सर्वपक्षीय श्रद्धांजली कार्यक्रमाला खासदार अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर, आ. नितीन देशमुख, आ. वसंत खंडेलवाल, आ. साजिद खान पठाण, गोपीकिशन बाजोरीया, अजहर हुसेन, विजय अग्रवाल, प्रकाश तायडे, श्रीरंग पिंजरकर, संग्राम गावंडे, अशोक अमानकर, प्रमोद देंडवे, रफिक सिद्दिकी, अशोक नागदिवे, संदीप पाटील, राजेश काळे, गिरीश जोशी, योगेश अग्रवाल, आशिष गावंडे, मो. फय्याज, संतोष अनासने, पवन महल्ले, प्रतुल हातवळणे, विजय मालोकार, निलेश देव, देवानंद टाले, जावेद जकारीया, कपिल रावदेव, कृष्णा अंधारे, मनोज गायकवाड, दिलीप देशमुख, संतोष डाबेराव, मुन्ना ठाकूर, नितीन झापर्डे, गौतम गवई, उषा विरक, मंदाताई देशमुख, सुषमा निचळ, प्रतिभा अवचार, रुपाली वाकोडे, सुनिता ताथोड, अश्विनी यादमराळे यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांची मोठ्या संख्येत उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज साबळे यांनी केले.दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना करत उपस्थित सर्वांनी सामूहिक मौन पाळले.

# सत्तेसाठी विचारसरणी, तत्त्वांना ठेवले बाजूला!

**♦ हिंदुत्वाच्या मुद्यालाही फाटा, भाजप-एमआयएम छुपी युती, शिवसेना उबाठाचे उपनेते नितीन देशमुखांची टीका**

प्रतिनिधी ३१ जानेवारी



**अकोला :** भाजपा सत्तेसाठी काहीही करण्याची तयारी आणि कोणत्याही थराला जाऊ शकतो, हे अकोल्यातील महापालिका सत्तास्थापनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आपले तत्त्व, विचारसरणी, हिंदुत्व आणि निष्ठेला सोईस्करपणे बाजूला सारत भाजपाने सत्ता हस्तगत केली, अशी घणाघाती टीका शिवसेनेचे (उबाठा) उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांनी केली आहे. भाजप-एमआयएम छुप्या युतीच्या आरोपांमुळे अकोल्यातील राजकारणात खळबळ उडाली असून नव्या वादाची ठिणगी पडली आहे.

विधानसभा निवडणुकीदरम्यान हिंदुत्वाच्या नावावर मते मागणाऱ्या भाजपाने 'कटेंगे तो बटेंगे' सारखे आक्रमक नारे देत जनतेची दिशाभूल केली. मात्र, त्याच हिंदुत्वाच्या नावावर निवडून आल्यानंतर अवघ्या मुस्लीम नगरसेवकांच्या सात मतांच्या गणितासाठी भाजपाने महापालिकेत हातमिळवणी करून सत्ता स्थापन केली, ही बाब दुर्दैवी असून, ढोंगीपणाचा कळस गाठणारी असल्याचे आमदार देशमुख यांनी ठणकावून सांगितले.

> मुस्लीम समाजाच्या सात नगरसेवकांची मदत घेऊन भाजपाने महापालिकेत सत्ता स्थापन केली. भाजपाने हिंदुत्वाच्या मुद्यावर विरोधात बसणे अपेक्षित होते. परंतु, सत्तेसाठी 'कटेंगे तो बटेंगे'चा नारा देऊन राज्यात सत्तेत बसली. आता त्याच सात नगरसेवकांचा आधार घेऊन महापालिकेत सत्ता स्थापन केल्याने भाजपाचा खरा चेहरा समोर आला आहे. अकोटची पुनरावृत्ती अकोल्यात झाल्याचे अधोरेखित होत आहे.
> **- नितीन देशमुख,** शिवसेना उपनेते तथा आमदार उबाठा

**सत्तेच्या गणितासाठी केली तडजोड**

आ. नितीन देशमुख यांच्या आरोपामुळे अकोल्याच्या राजकारण खळबळ उडाली असून विरोधकांना भाजपाविरोधात आक्रमक होण्याची आयती संधी मिळाली आहे. एकीकडे भाजप विकास आणि विचारधारेचे दावे करत असताना दुसरीकडे सत्तेच्या गणितासाठी तडजोडींचा मार्ग स्वीकारत असल्याने जनतेत संभ्रम निर्माण झाला आहे.

'आज भाजपाचा खरा चेहरा अकोलेकरांच्या समोर आला आहे. सत्तेसाठी आपली तत्त्वे, विचारधारा आणि हिंदुत्वाचे गोडवे गाणाऱ्या भाजपाने धारण केलेला मुखवटा आज गळून पडला असून, खरा चेहरा समोर आला आहे, असेही नितीन देशमुख म्हणाले. महापालिकेतील सत्तास्थापनेसाठी भाजपाने केलेली ही तडजोड म्हणजे हिंदुत्वाच्या मूळ विचारांशी केलेली प्रतारणा असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# महानगरात खंडेलवाल समाजाचा वसंत पंचमी उत्सव

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोला:** सामाजिक व सांस्कृतिक सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या श्री खंडेलवाल वैश्य सभेच्या वतीने महानगरात दोन दिवसीय खंडेलवाल दिन व बसंत पंचमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.दि ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी रोजी स्थानीक आळशी प्लॉट येथील खंडेलवाल भवन येथे आयोजित या उत्सवाचा प्रारंभ आज शनिवार दि ३१जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता खंडेलवाल भवनात समाजाच्या युवा संघटनच्या वतीने क्रीडा स्पर्धा होणार आहेत.यात १० वर्षापर्यंत बालकां साठी निंबु चम्मच धाव स्पर्धा,११ ते १९ वर्षातील युवकांसाठी रस्सी खेच स्पर्धा,१६ वर्षा वरील युवकांसाठी बुद्धिबळ स्पर्धा होऊन सायंकाळी ५ वाजता महिला मंडळाच्या वतीने माचीसच्या काड्यापासून रांगोळी स्पर्धा,सासू कडून सुनेला साडी नेसविणे ही स्पर्धा होऊन रात्री ७ वाजता महिला व युवा संघटनच्या वतीने भव्य आनंद मेळा होणार आहे. रविवार दि १ फेब्रुवारी रोजी खंडेलवाल भवन येथे सकाळी ९-१५वाजता महिला मंडळाची हक्का नुडल्स पासून व्यंजन स्पर्धा, खजूर पासून पदार्थ बनविणे,कॉर्न चाट बनविणे आदी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. सकाळी १०-३० वाजता हस्तकला प्रदर्शनी प्रारंभ होऊन या नंतर स्व सवित्रीदेवी खंडेलवाल यांच्या स्मृतीत सोलर उपकरणाचा लोकार्पण सोहळा होणार असून यात प्रमुख पाहुणे म्हणून आ वसंत खंडेलवाल, जेष्ठ समाजसेवी डॉ सुरेश खंडेलवाल नागपूर, सीए राजेंद्र खंडेलवाल अमरावती,राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल हे उपस्थित राहणार आहेत.सकाळी ११ वाजता खंडेलवाल वैश्य सभेची कार्यकारी सभा होणार आहे. दु ३ वाजता महिला मंडळाच्या वतीने भव्य सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. दुपारी ४ वाजता पोलीस प्रशासनाच्या वतीने सायबर फसवणूक जागृती कार्यशाळा होणार असून साय ५ वाजता पुरस्कार वितरण सोहळा होऊन या उत्सवाचे समापन होणार आहे. समाजातील महिला पुरुषांनी या दोन दिवसीय खंडेलवाल दिन व बसंत पंचमी उत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन खंडेलवाल वैश्य सभेचे अध्यक्ष संजय खंडेलवाल, खंडेलवाल चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोद खंडेलवाल, महिला मंडळाच्या अध्यक्ष सौ आरती खंडेलवाल,खंडेलवाल युवा संघटनचे अध्यक्ष नरेश खंडेलवाल समवेत समस्त पदाधिकारी,महिला मंडळ, युवक संघटनने केले.

# जलवाहिनी लिकेजमुळे रस्त्यावर पाणीच पाणी

**बाळापूर:** शहरातील फिल्टर छत्री रोडवर जलवाहिनी लिक झाल्यामुळे संपूर्ण रस्ता चिखलमय झाला. त्यामुळे दुचाकी वाहनधारक व पायी चालणे कठीण आहे.

शहरातील पाणीपुरवठा जलशुद्धीकरण केंद्राकडे जाणारा मुख्य रस्ता या मार्गावरील पाईपलाईन लिक झाल्यामुळे रस्त्यातून वाहन काढणे व पायी चालणे कठीण झाले आहे. हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. याच रोडवर समोर ऐतिहासिक जयसिंग राजे यांच्या घोड्याची समाधी आहे. ही ऐतिहासिक वास्तू पाहण्यासाठी दुरदुरून पर्यटक बाळापुर शहरात येत असतात. त्याचबरोबर वीट भट्टी कामगार हे सुद्धा याच रस्त्याने जाणे येणे करत असतात. त्यांना कित्येक दिवसापासून या त्रासाला समोर जावे लागत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित दखल घेऊन पाईपलाईन व्यवस्थित करून व रोडवर पडलेले खड्डे तातडीने दुरुस्त करावे. तसेच होत असलेला त्रास दूर करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

# शहराचा विकास हाच आमचा ध्यास- आ. रणधीर सावरकर

**♦ नागरिकांचा विश्वास सार्थ ठरवू, कार्यालयात साध्यापद्धतीने कार्यक्रम**

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरच्या नागरिकांनी दाखवलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, जात-पात, धर्म, पक्षभेद न पाहता शहराचा सर्वांगीण, सर्वस्पर्शी विकास करणे हाच एकमेव ध्यास शहर सुधार आघाडीचा राहील, असा ठाम निर्धार आमदार रणधीर सावरकर यांनी व्यक्त केला.

शारदा खेडकर यांची महापौरपदी तर अमोल गोगे यांची उपमहापौरपदी निवड झाल्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या राजकीय शोकभावनेच्या पृष्ठभूमीवर कोणतीही आतषबाजी, घोषणाबाजी अथवा हार-तुरे न स्वीकारता साध्या पद्धतीने हा कार्यक्रम पार पडला. आमदार सावरकर म्हणाले, कमी मतांनी पराभूत झालेले कार्यकर्ते हताश न होता सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून पक्षाची व स्वत:ची प्रतिमा अधिक उंचवावी. पक्ष ही आपली आई असून, पक्षाने घेतलेल्या निर्णयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही प्रत्येक कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे. पक्ष प्रत्येकाच्या कामगिरीवर लक्ष ठेवून असतो. त्यामुळे मोठ्या उद्दिष्टाने, निष्ठेने काम करावे. पक्षविरोधी भूमिका घेणाऱ्यांचा सन्मान केला जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.



हा विजय अकोल्यातील जनतेला व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समर्पित करत आमदार सावरकर म्हणाले, भाजपा कार्यकर्ता हा पक्षाचा आत्मा असून, अकोलेकर ही आमची खरी ताकद आहे. राजराजेश्वर नगरीवरील प्रेम, जनतेचा विश्वास अबाधित ठेवत महायुती सरकारच्या माध्यमातून शहर सुधार आघाडीने दिलेली सर्व वचने पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयंत मसने होते. मंचावर खासदार अनुप धोत्रे, विजय अग्रवाल, संतोष शिवरकर, किशोर पाटील, वसंत बाधुका, शारदा खेडकर, अमोल गोगे, वैशाली शेळके, पूजा गावंडे. उषा विरक, पवन महल्ले, कृष्णा शर्मा, माधव मानकर, अंबादास उमाळे, आम्रपाली उपरवट, चंदा शर्मा, संजय गोटफोडे, ॲड. देवाशिष काकड आदी उपस्थित होते. यावेळी कार्यकर्त्यांच्या बळावर हा विश्वासाचा विजयरथ अविरत सुरू राहील, असा विश्वास विजय अग्रवाल यांनी व्यक्त केला. संचालन माजी नगरसेवक व जिल्हा प्रसिद्धीप्रमुख गिरीश जोशी तर आभार गटनेते पवन महल्ले यांनी मानले.

> **समाजसेवेचे कार्य शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणार- खा. धोत्रे**
> जय-पराजयाने भाजपा कार्यकर्ता कधीही हतबल होत नाही. आत्मचिंतनातून अधिक जोमाने समाजसेवेचे कार्य करत शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे हीच भाजपाची ओळख आहे. मित्रपक्षांच्या सहकार्याने मिळालेला हा विजय शहराच्या विकासासाठी आहे, असे खा. अनुप धोत्रे म्हणाले.

# राजंदाच्या युवकाचा तहसीलमध्ये आत्मदहनाचा प्रयत्न !

प्रतिनिधी ३१ जानेवारी

**बार्शिटाकळी :** तालुक्यातील राजदाच्या युवकाने तहसील कार्यालयाच्या आवारात शुक्रवारी ज्वलनशील पदार्थ अंगावर घेत आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी वेळीच सावधानता बाळगत हा डाव उधळून लावल्याने युवकाचे प्राण वाचले.

**पोलिसांच्या सतर्कतेने उधळला डाव**

राजंदा गावातील सामाजिक कार्यकर्ते मयूर हरिभाऊ काळे यांनी बार्शिटाकळीचे तहसीलदार यांच्याकडे ११ जानेवारीला दिलेल्या निवेदनातून, राजंदा गावातील भाग एकचे तलाठी सुरेश चऱ्हाटे व भाग दोनचे तलाठी नाना इंगळे हे १० ते १५ वर्षांपासून कार्य आहेत. गावातील काही लोकाशी संगनमत करून खुल्या मुरुमाची विक्री होत आहे. तसेच रेती व मुरुमांचे ट्रॅक्टर अतिशय वेगाने वाहतूक करत असल्यामुळे अपघाताची शक्यता आहे. तसेच शासनाचा महसूल बुडत असून तो त्यांच्याकडून वसूल करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत, असे निवेदनात नमूद केले होते. तसेच दोषीवर कारवाई न झाल्यास ३० जानेवारीला तहसील कार्यालयात आत्मदहन करणार अशा गंभीर स्वरुपाची तक्रार केली होती. त्यानुसार ३० जानेवारीला दुपारी १२.१२० ते १ वाजेच्या सुमारास सदर युवकाने तहसील कार्यालयाच्या परिसरात ज्वलनशील पदार्थ अंगावर घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

> आत्मदहन करणाऱ्या व्यक्तीने दिलेल्या तक्रारीची चौकशी केली असता सदर तक्रार तथ्यहिन असल्याचे आढळून आले आहे. तसेच तक्रारदार यांना याबाबत पत्रव्यवहार केला असून, त्याची प्रत बार्शिटाकळीचे ठाणेदार यांना दिलेली आहे.
> **रवींद्र कापशीकर,**
> तहसीलदार, बार्शिटाकळी

CLASSIFIED

हॅड्रा फेशियल ३० टक्के ऑफर
३० तारखेपासून २ पर्यंत
ब्यूटीपार्लर क्लासेस सुध्दा
घेतल्या जातील
प्रोफेशनल मेकअप
विनस ब्यूटी पार्लर
राधा नगर विनायक नगर, अमरावती
प्रो.प्रा. प्रीति तायवाडे
मोबा.९०२२६०८२३२

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135